रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १६ ◆ अंक २६३
www.ramprahar.com

गुरुवार, ११ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२







## एमपीएससी : २०२१च्या ‘पीएसआय’ची गुणवत्ता यादी जाहीर



**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब मुख्य परीक्षा २०२१ या परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. अनाथ आरक्षणासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार अनाथ दोन पदे या जाहिरातीमध्ये समाविष्ट करून ३७८ पदांसाठीही सर्वसाधारण गुणवत्ता यादी आहे. एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. ही गुणवत्ता यादी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून, विविध दाव्यांच्या अनुषंगाने अंतिम निकालापूर्वी पडताळणीअंती काही उमेदवारांच्या दाव्यांमध्ये, शिफारसींमध्ये बदल होऊ शकतो. एमपीएससीने या निकाल जाहीर केल्याने या प्रक्रियेत सहभागी उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.

# संविधान धोक्यात असल्याचा काँग्रेसकडून खोटा प्रचार

## ■ रामटेकच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा घणाघाती हल्ला

**रामटेक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी (दि.१०) रामटेक दौऱ्यावर होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महायुतीच्या नितीन गडकरी आणि राजू पारवे यांच्या प्रचारासाठी नागपुरात आले होते. या वेळी त्यांनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली. या वेळी पंतप्रधान मोदी यांनी, संविधान धोक्यात असल्याचा खोटा प्रचार सुरू आहे, असा आरोप केला.

रामटेक आणि नागपूरसाठी नरेंद्र मोदी यांनी एकत्रीत सभा घेतली. १९ तारखेला सर्वांत जास्त मतदान करण्याचा संकल्प करा. पुन्हा एकदा मोदी सरकार, अशी घोषणादेखील पंतप्रधान मोदींनी दिली. रामटेकच्या कन्हानमध्ये मोदी



बोलत होते. काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकारण संपवले, त्यांना भारतरत्न दिले नाही, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी या वेळी केला. फक्त तुम्हाला खासदार निवडायचा नाही तर विकसित भारतासाठी मतदान करा, असेही मोदी म्हणाले. विरोधकांकडे आरोप करण्यासाठी नवीन मुद्दे नाहीत. पाण्यात काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, तुम्हाला यंदा फक्त खासदार निवडायचा नाही तर पुढील एक हजार वर्षांच्या मजबूत भारतासाठी पाया रचायचा आहे. मीडिया सर्व्हेमध्ये एनडीएचा बंपर विजय दाखवला जात आहे. कशाला सर्व्हे करता? जेव्हा मोदीला शिव्या वाढतात, म्हणजेच ’फिर एक बार..’ जेव्हा मोदींच्या आई वडिलांना शिव्या देतात, म्हणजेच पुन्हा एकदा आमचीच सत्ता येणार असल्याचे स्पष्ट आहे. माझे देशातील नागरिकांना म्हणणे आहे एकसंघ होऊन देशासाठी मतदान करा.

### ‘आम्हाला मत म्हणजे विरोधकांना शिक्षा‘

भाजप–शिवसेना–राष्ट्रवादी यांना मतदान म्हणजे विरोधकांना शिक्षा आहे. त्यांना पापाची शिक्षा मिळायला हवी. काँग्रेसने ओबीसी समाजाला मागे ठेवले. गरीबाचा मुलगा पंतप्रधान झाल्यावर म्हणतात लोकशाही धोक्यात आली. जेव्हा आणीबाणी लागू केली तेव्हा लोकशाही धोक्यात नव्हती का?, इंडिया आघाडीवाले गरीबांना कधीच पुढे जाऊ देत नाही. हे एकत्र झाले तर देशात दुही माजवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी या वेळी केला.

# उद्धव ठाकरेंनी मुंबईसाठी केलेले एक चांगले काम दाखववावे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आव्हान



**मुंबई : प्रतिनिधी**


उद्धव ठाकरेंनी महापालिकेची सत्ता असताना गेल्या २५ वर्षांत मुंबईसाठी केलेले एक चांगले काम दाखवावे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. उत्तर मुंबई मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार केंद्रीय वाणिज्य मंत्री खासदार पियूष गोयल यांच्या कांदिवली येथील निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी (दि. १०) करण्यात आले. त्यानंतर गोयल यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत फडणवीस बोलत होते.

गोयल यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचे आवाहनही फडणवीस यांनी या वेळी केले. या वेळी मुंबई उपनगर पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार ॲड.आशिष शेलार, खासदार गोपाळ शेट्टी, ज्येष्ठ नेते पद्म भूषण राम नाईक, आमदार प्रवीण दरेकर, विजय गिरकर, योगेश सागर, अतुल भातखळकर, सुनील राणे, मनीषा चौधरी, प्रकाश सुर्वे, शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष इंद्रपाल सिंह, आर. पी.आयचे उत्तर मुंबई अध्यक्ष रमेश गायकवाड आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, गेल्या १० वर्षांत मोदी सरकारने मुंबईतील सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवले आहे. मुंबईमध्ये विविध विकास कार्यांचा धडाका लावत प्रत्येक वर्गातील माणसाचे जीवन सुकर करण्याचा विडा केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकारने उचलला आहे. सामान्य माणसाच्या जीवनात कायापालट घडवून आणण्यासाठी मोदी सरकार गेल्या १० वर्षांपासून अथक कार्य करत आहे. यापुढे पाच वर्षे विकासाचे इंजिन वेगाने धावण्यासाठी देशाची सूत्रे मोदी सरकारच्याच हाती द्यायला हवी. महायुती म्हणजे सर्वसामान्य सर्वांना सामावून घेत सर्वांगीण विकास करणारी रेल्वे आहे. अशा रेल्वे मध्ये आपल्याला बसायचे आहे की विरोधकांच्या वेगवेगळ्या दिशेने जाणाऱ्या इंजिनच्या रेल्वेत बसायचे आहे हे सूज्ञ मतदारांनी ठरवायचे आहे, असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला.

# महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा पुन्हा इशारा

## ■ विदर्भ, मराठवाड्यात रेड अलर्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

पुढील चार ते पाच दिवस राज्यात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. अशातच बुधवारी (दि. १०) पुन्हा हवामान विभागाने मुसळधार पावसाचा रेड अलर्ट दिला आहे.

विदर्भातील अकोला, वाशिम आणि यवतमाळ या तीन जिल्ह्यात हवामान विभागाने पावसाचा रेड अलर्ट जारी केलाय. तसेच वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यतादेखील वर्तवली आहे. तर विदर्भ काही जिल्ह्यासह मराठवाड्यात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, अकोला जिल्ह्यात जोरदार अवकाळी पावसाचा सलग दुसऱ्या दिवशी बुधवारी सायंकाळी तडाखा बसला आहे. चार हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून ५५ घरांची पडझड झाली. ७४ गावांमध्ये अवकाळी पावसामुळे नुकसान झाले.

## केजरीवालांची दुसरी याचिकाही फेटाळली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी केजरीवाल यांची अटक आणि कोठडी कायदेशीर ठरवत त्यांची याचिका फेटाळली होती. तर बुधवारी (दि. १०) सकाळी दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने केजरीवाल यांची वकिलांशी संबंधित दुसरी याचिकाही फेटाळली. यात केजरीवाल यांनी आठवड्यातून पाच वेळा वकिलांना भेटण्याची परवानगी मागितली होती.

दिल्ली दारू घोटाळ्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अडकलेल्या अरविंद केजरीवाल यांना ’धक्के पे धक्के’ बसत आहेत. गेल्या केवळ २४ तासांतच त्यांना अनेक मोठे झटके बसले आहेत.

# भाजपकडून उमेदवारांची दहावी यादी जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारतीय जनता पक्षाने बुधवारी (दि. १०) लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची दहावी यादी प्रसिद्ध केली आहे. या यादीमध्ये भाजपने चंडीगड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील एकूण नऊ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे.

भाजपने प्रसिद्ध केलेल्या यादीमध्ये चंडीगडमध्ये संजय टंडन यांना उमेदवारी दिली आहे. तर उत्तर प्रदेशमध्ये मैनपुरी येथून जयराज सिंह ठाकूर, कौशाम्बी येथून विनोद सोनकर, फूलपूर येथून प्रवीण पटेल, अलाहाबाद (प्रयागराज) येथून नीरज त्रिपाठी, बलिया येथून नीरज शेखर, मछलीशहर येथून बी.पी. सरोज आणि गाझीपूर येथून पारसनाथ राय यांना उमेदवारी दिली आहे.

या यादीमधून भाजपने पश्चिम बंगालमधील आसनसोल मतदारसंघातील आपल्या उमेदवाराचीही घोषणा केली आहे. भाजपने आसनसोल येथून एस. एस. अहलुवालिया यांना उमेदवारी दिली आहे. त्यांचा सामना तृणमूल काँग्रेसच्या शत्रुघ्न सिन्हा यांच्याशी होणार आहे.

# कारचा भीषण अपघात; पाच जण जागीच ठार



**तामिळनाडू :** विरुद्धनगर–मदुराई हायवेवर एका कार अपघातामध्ये पाच जणांनी जागीच जीव गमावला. यामध्ये एकाच कुटुंबातील चौघांचा समावेश आहे. कार दुभाजकावर आदळल्यानंतर पलटी मारत थेट हायवेच्या दुसऱ्या टोकापर्यंत गेली. पोलिसांनी या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज रिलीज केले आहे. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला असून, चार जण एकाच कुटुंबातील असल्याची माहिती मदुराई जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षकांनी दिली आहे.

## निवडक

### नाना पटोलेंच्या गाडीला ट्रकची जोरदार धडक

**भंडारा :** भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राच्या निवडणूक प्रचाराने जोर पकडला असून मंगळवारी रात्री महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या गाडीला एका ट्रकने मागून धडक दिली. या कारमध्ये पटोले नसल्याने ते बचावले आहेत. प्रचार आटोपून सुकळी या स्वगावी परत जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिली. दरम्यान, या अपघाताबाबत काँग्रेसने केलेला घातपाताचा आरोप भाजपकडून फेटाळण्यात आलेला आहे.

### भाजप उमेदवाराकडून शशी थरूरांना मानहानीची नोटीस

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहेत. प्रचाराचा धुरळा उडत आहे. यादरम्यान, केरळमधील तिरुवनंतपुरममधील भाजपचे उमेदवार राजीव चंद्रशेखर यांनी काँग्रेसचे उमेदवार शशी थरूर यांना मानहानीची नोटीस पाठवली आहे. लोकसभेचा गैरफायदा घेण्यासाठी खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती पसरवून आपली प्रतिमा डागाळल्याचा आरोप भाजप उमेदवार राजीव चंद्रशेखर यांनी केला आहे.



# ‘मविआ’च्या जागावाटपानंतर सांगलीतील स्थानिक नेते नाराज

## निर्णयाचा फेरविचार करण्याची विश्वजित कदमांची मागणी




**सांगली : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या जागावाटपानंतर सांगलीत मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली, सांगलीची जागा काँग्रेसलाच मिळावी यासाठी स्थानिक नेत्यांनी राज्य आणि केंद्रातील नेत्यांकडे प्रयत्न केले, परंतु ही जागा ठाकरे गटालाच गेल्याने स्थानिक नेत्यांनी पत्रकार परिषद घेतली.

महाविकास आघाडीने जागावाटप जाहीर केले. आजही सांगली जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीची पारख करून या निर्णयाचा फेरविचार करावा ही आमची महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांना विनंती आहे. ही माझी व्यक्तिगत नाही तर काँग्रेस पक्षाची भावना आहे. काँग्रेस पक्षाची ही जागा असून मविआने गांभीर्याने या जागेबाबत विचार करावा, अशी मागणी काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनी केली आहे.

सांगलीत पत्रकार परिषद घेत विश्वजित कदम म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी परस्पर चंद्रहार पाटलांची उमेदवारी सांगलीत जाहीर केली. हा एकतर्फी निर्णय होता, महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना विश्वासात घेऊन निर्णय व्हायला हवा होता. उद्धव ठाकरेंनी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांची भावना समजून घेऊन जर निर्णय घेतला असता तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, मागच्या दोन्ही निवडणुकांमध्ये सांगलीत काँग्रेस दिसली नाही. २०१४ च्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराचा तिथे चार लाख मतांनी पराभव झाला होता. २०१९ ला काँग्रेसने ती जागा त्यांच्या मित्रपक्षासाठी सोडली होती. भावनिकदृष्ट्या काँग्रेस तिथे दावा करू शकते, मात्र त्यात तथ्य नाही, अशी प्रतिक्रिया खासदार संजय राऊत यांनी दिली आहे.








# सनातन संस्कृती संपविण्यासाठी काँग्रेस आणि द्रमुकची हातमिळवणी

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तामिळनाडूतून हल्ला

**तामिळनाडू : वृत्तसंस्था**

'सनातन' नष्ट करणे हे काँग्रेस आणि द्रमुकचे लक्ष्य आहे. हिंदू धर्मात अस्तित्त्वात असलेली शक्ती नष्ट करू, असे म्हणणारे काँग्रेसचे युवराज आणि सनातनच्या विनाशाच्या चर्चा करणारी द्रमुक यांची मानसिकता एकच असल्याने काँग्रेस व द्रमुक हे देशात एकत्रपणे भेदभाव आणि विनाशाचा खेळ खेळत आहेत, अशी भेदक टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि.१०) तामिळनाडूमधील वेल्लोर आणि मेत्तुपलयम (कोयंबतूर) येथे झालेल्या विशाल जाहीर सभेत बोलताना केली.



कौटुंबिक राजकारण, भ्रष्टाचार आणि तामिळविरोधी संस्कृतीला प्रोत्साहन देणारी द्रमुक ही एका कुटुंबाची कंपनी बनली आहे. द्रमुकच्या कौटुंबिक राजकारणामुळे तामिळनाडूतील तरुणांना पुढे जाण्याची संधी मिळत नाही. काँग्रेस आणि द्रमुकसारखे घराणेशाही पक्ष तरुणांच्या आकांक्षा कधीच पूर्ण करू शकत नाहीत, याची जाणीव असल्यामुळेच रालोआच्या सकारात्मक कामांना लोकांचा पाठिंबा मिळत असून भाजपप्रणित 'एनडीए'मुळेच तामिळनाडूतून द्रमुकला निरोप मिळेल, ही जनतेची भावना आहे, असे मोदी म्हणाले. द्रमुकने तामिळनाडूला जुन्या घराणेशाहीच्या राजकारणात गुरफटवून ठेवले नसते, तर तामिळनाडूने विकसित देशाचे नेतृत्व केले असते. द्रमुकचे कौटुंबिक राजकारण, भ्रष्टाचार आणि तामिळविरोधी संस्कृती यांमुळे तामिळनाडूचा विकास रोखला गेला, अशा शब्दांत त्यांनी द्रमुकच्या घराणेशाही राजकारणावर कोरडे ओढले. भ्रष्टाचाराचा पहिला 'कॉपीराईट' द्रमुकला मिळाला असून एक संपूर्ण कुटुंब मिळून तामिळनाडूला लुटत आहे, असेही पंतप्रधान म्हणाले.

भेदभाव आणि विभाजनाचा जो धोकादायक खेळ काँग्रेस देशात खेळते, तोच खेळ द्रमुक तामिळनाडूत खेळत आहे. तामिळनाडूचा विकास हा द्रमुकच्या राजकारणाचा केंद्रबिंदू कधीच राहिला नाही. काँग्रेसनेही विकासाचे राजकारण केले नाही, तामिळनाडूत द्रमुकही काँग्रेसचेच अनुकरण करीत आहे. काही दशकांपूर्वी काँग्रेसचे सरकार असताना त्यांनी श्रीलंकेला कच्चाथिवू बेट दिले होते. हा निर्णय कोणाच्या फायद्यासाठी घेतला यावर आता काँग्रेसने मौन बाळगले, असा आरोप त्यांनी केला. आज देश मेक इन इंडियाकडे वाटचाल करत आहे, पण देशातील गुंतवणुकीचा ओघ रोखणाऱ्या प्रवृत्तींना द्रमुक पाठिंबा देत आहे. २१व्या शतकात आपल्याला एकत्रितपणे भारत आणि तामिळनाडूचा विकास करायचा आहे. गेल्या दहा वर्षांत एनडीएच्या केंद्र सरकारने विकसित भारताचा पाया रचला आहे. २०१४ पूर्वी भारताकडे कमकुवत देश म्हणून पाहिले जात होते. देशात रोज फक्त भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांच्या बातम्या झळकत होत्या. देशाची अर्थव्यवस्था कोलमडू शकते असे म्हटले जात होते, मात्र आज भारत संपूर्ण जगासमोर एक शक्ती म्हणून उदयास येत आहे आणि यामध्ये तामिळनाडूचा मोठा वाटा आहे. अंतराळ क्षेत्रात भारताला पुढे नेण्यात तामिळनाडूने मोठे योगदान दिले आहे, अशा शब्दांत त्यांनी तामिळनाडूचा गौरव केला.

इंडी आघाडीतील पक्षांनी अनुसूचित जाती-जमाती आणि अन्य मागासवर्गीयांच्या विकासात अनेक वर्षांपासून अडथळे आणले. कोट्यवधी लोकांना घर, वीज आणि पाण्यासाठी अतोनात त्रास दिला, पण भाजप सरकारने ८० कोटी लोकांना मोफत धान्य, चार कोटी लोकांना घरे आणि प्रत्येक गावात वीज पोहचवली आहे. तामिळनाडूत द्रमुक सरकार मात्र, केंद्राच्या नळपाणी योजनेचे लाभ देण्याबाबत पक्षपातीपणा करत आहे. काँग्रेसने दशकांपूर्वी गरिबी हटवाचा नारा दिला, पण गरिबी हटली नाही, पण रालोआ सरकारने २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढले, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्रात आतापर्यंत १४ हजार ३६८ मतदारांच्या तक्रारींचे निवारण

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यापासून भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर प्राप्त तक्रारींचे तातडीने निवारण करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील मतदारांकडून आतापर्यंत १४ हजार ७५३ इतक्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यांपैकी १४ हजार ३६८ तक्रारींचे निवारण करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

देशात मतदारांच्या तक्रारींचे निवारण करण्यामध्ये महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. नागालँड पहिल्या आणि गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आहे, मात्र नागालँडमध्ये आतापर्यंत फक्त १८ तर गुजरातमध्ये ७,१२४ तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. महाराष्ट्रातील तक्रारींमध्ये पुणे जिल्ह्यातून सर्वाधिक म्हणजे दोन हजार ८१८, मुंबई उपनगरातून दोन हजार ३३१ आणि ठाण्यातून दोन हजार १८३ तक्रारी आलेल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातून सर्वांत कमी म्हणजे ३४ तक्रारी आलेल्या आहेत.

सर्वाधिक तक्रारींमध्ये मतदार ओळखपत्र प्राप्त न झालेल्यांमध्ये चार हजार ५५६ तक्रारींचा समावेश आहे. मतदार ओळखपत्रावरील दुरुस्त्या करण्यास विलंब झाल्याबद्दल एक हजार ८४८ तक्रारी आल्या आहेत. ई-मतदार ओळखपत्राविषयी १,०४७ तक्रारी आहेत, तर नवे ओळखपत्र मिळवण्याधा अर्ज नाकारल्याबद्दल ५२१ तक्रारी दाखल झालेल्या आहेत. मतदार यादीत नाव न सापडल्याबद्दल ५०० तक्रारी आलेल्या आहेत.

तक्रारींमध्ये मतदार ओळखपत्र, मतदार यादी, मतदान स्लिप, निवडणूक आयोगाची विविध ॲप्स, राजकीय पक्ष, मतदान दिन आणि इतर या विषयांवरील तक्रारींचा समावेश आहे. मतदारांच्या तक्रारींचे निवारण करताना त्यांना समाधानकारक उत्तरे दिली जातात. मतदार ओळखपत्र प्राप्त न झालेल्या मतदारांना मतदार नोंदणीपासून ओळखपत्र मिळेपर्यंतचा कालावधी साधारण ४५ दिवसांचा असतो, मात्र ई-ओळखपत्र दहा-बारा दिवसांत मिळू शकते, त्यासाठी त्यांनी मतदार यादीत मोबाइल क्रमांक नोंदवावा, असे सांगितले जाते, कोणाला मतदार यादीत नाव सापडत नसल्यास त्यांना नाव शोधण्याची प्रक्रिया सांगितली जाते, तसेच कोणाचे नाव वगळले गेले असल्यास त्याचे कारण आणि प्रक्रिया सांगितली जाते. प्रश्नकर्त्यांचे उत्तराने समाधान न झाल्यास त्याला पुन्हा प्रश्न विचारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

# सफाईचा कालबद्ध आराखडा तयार करा

## आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिघा विभागातील विविध सेवासुविधांचा पाहणी दौरा केला. रस्ते खड्डेमुक्त असावेत आणि काटेकोर स्वच्छता असावी याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. पावसाळापूर्व कामांमध्ये गटार साफ केल्यानंतर त्यातून काढला जाणारा गाळ तीन दिवसांत उचलून नेण्याच्या सक्त सूचना केल्या. झोपडपट्टी भागात सेप्टीक टँक असलेल्या शौचालयांचे टँक नियमितपणे स्वच्छ राहतील याची दक्षता घेण्यासोबतच त्याच्या सफाईचा कालबध्द आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

रस्त्यांची नियमित साफसफाई ६ वाजता सुरू होऊन ८ वाजेपर्यंत पूर्ण व्हावी व त्यानंतर अनुषांगिक स्वच्छता कामे करावीत, असे निर्देश दिले. दिघा विभाग कार्यालयाजवळील ओएस प्लॉटवर सुरू असलेले जलकुंभ आणि माताबाल रुग्णालय इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना, बांधकामे सुरू असतानाच तेथील रस्त्यांची कामे तसेच अंतर्गत जलवाहिन्या टाकण्याची कामे समांतरपणे करून घ्यावीत व कामांची कालमर्यादा पाळावी अशा स्पष्ट सूचना दिल्या. रामनगर सुलभ शौचालयाची पाहणी व शौचालय दुरुस्ती व स्वच्छतेवर अधिक काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश दिले. मुकंद कंपनीजवळ पावसाळयात अतिवृष्टी व भरतीच्या काळात रेल्वेच्या पूलाखाली साचणाऱ्या पाण्याचा प्रश्न लक्षात घेऊन पुलाशेजारी रस्त्याच्या दोन्ही बाजूला पावसाळी साचणारे पाणी वाहून जाण्यासाठी चर खोदण्याच्या सूचना केल्या. ग्रीन वर्ल्ड इमारतीच्या पाठीमागील बाजूस डोंगराकडील पाणी खाडीकडे नेणारा नैसर्गिक नाल्याचा खाडीकडील साधारणत: ६०० मीटरचा भाग अधिक काटेकोर दक्षता घेऊन स्वच्छ करण्याचे निदश दिले.

१४ एप्रिलला स्मारकात साजरा होणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव निवडणूक आचार संहितेचे पालन करून साजरा करण्याच्या सूचना. स्मारकाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर स्मारकाच्या समाजमाध्यमांच्या लिंक प्रदर्शित करण्याच्या सूचना केल्या.



# पनवेल महापालिका क्षेत्रात मान्सूनपूर्व नाले स्वच्छतेला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्यामध्ये पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये याकरिता पनवेल महानगरपालिकेने कंबर कसली आहे. महापालिका क्षेत्रातील मान्सूनपूर्व नालेस्वच्छतेला सुरुवात झाली आहे. सध्या कामोठे व कळंबोलीतील नाल्यांची साफसफाई करण्यास पालिकेने सुरुवात केली आहे. प्रभाग क्र.९ कळंबोली विभाग खिडुकपाडा येथील नाले साफसफाई कामाची पाहणी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. प्रशांत रसाळ यांनी बुधवारी (दि.१०) केली.

या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, मलनिस्सारण विभाग प्रमुख किरण जाधव, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे आणि स्वच्छता निरीक्षक अमित जाधव उपस्थित होते.



नुकत्याच झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत आयुक्तांनी घनकचरा व स्वच्छता विभागास सर्व नाल्यांची सद्यस्थिती व त्या भागातल्या अडचणी समजून घेऊन नालेसफाईची कामे सुरू करण्याबाबत अधिकारी व कर्मचाऱ्यांना आदेशित करण्यात आले होते. त्यानुसार सध्या कळंबोली व कामोठ्यातील नाल्यांची साफसफाई करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. या कामासाठी कळंबोलीमध्ये दोन पोखलन, दोन जेसीबी, दोन टिपर, दोन टिपर, १७० मनुष्यबळ कार्यरत आहे, तसेच कामोठ्यामध्ये ९३ मनुष्यबळाच्या आधारे नालेसफाईची कामे करण्यात येत आहेत.

याबरोबरीने येत्या काही दिवसात खारघर व पनवेलमधील सर्व नाल्यांची साफसफाईस सुरुवात होणार आहे. सर्व नाल्यांची साफसफाई झाल्यानंतर शहरांमध्ये निर्माण होणारी पूरपरिस्थितीचा प्रभाव कमी होण्यास मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून हे नालेसफाईचे काम करण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने मोठे नाले, गटारे यांच्या स्वच्छतेला सुरुवात केली जात आहे.

# मतदान केल्याची शाई दाखवा, हॉटेलात १० टक्के सूट मिळवा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये आता हॉटेल व्यावसायिक सहभागी झाले आहेत. बोटाला मतदान केल्याची शाई दाखवा आणि १० टक्के सूट मिळवा, अशी योजना शहरातील प्रमुख हॉटेल व्यावसायिकांनी तयार केली आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी शहरातील हॉटेल व्यावसायिकांची बैठक घेतली होती. त्यामध्ये लोकशाहीचा जागर करीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी हॉटेल व्यावसायिकांना सहभागी केले.

मतदान करा, शाई दाखवा आणि हॉटेलमध्ये १० टक्के सूट मिळवा, अशी संकल्पना हॉटेल व्यावसायिकांची आहे. ७ ते १० मेपर्यंत अनेक हॉटेलमध्ये जेवणावर १० टक्के सूट मिळणार आहे. सर्वांनी आपल्या बहुमोल मताचा हक्क बजवावा आणि मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी असा उपक्रम हाती घेतला आहे. ७ मे रोजी सकाळपासून ही संधी खुली असेल. त्यासाठी अधिकाधिक नागरिकांनी मतदान करा, असे आवाहनही त्यांनी केले.

**मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आपण विविध संकल्पना राबवित आहोत. त्यातच येथील नागरिकांना हॉटेलिंग अवडत असल्याने त्याकडे फोकस करूनही संकल्पना राबविली आहे जेणे करून मतदानाचा टक्का वाढेल.**

**-विक्रम पाटील, तहसीलदार, अलिबाग**

# पंतप्रधान मोदींचे हात बळकट करूया

## भाजप नेते वैकुंठ पाटील यांचे आवाहन

**पेण : रामप्रहर वृत्त**

देशात होत असलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या आपकी बार ४०० पार या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करण्याकरीता कार्यकर्त्यांनी सज्ज होऊन रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना निवडून आणण्याची जबाबदारी आपली असल्याचे भाजप जिल्हा समन्वयक वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

रायगड लोकसभा महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांच्या नियोजनाबाबत भाजपची मोर्चेबांधणी बैठक नुकतीच वडखळ व हमरापूरमध्ये पार पडली. या वेळी जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, पेण तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, बाबुराव खेडेकर, जिते विभागप्रमुख वासुदेव म्हात्रे, मोहन नाईक, वासुदेव पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पेणच्या विकासासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरीव निधी दिला असून विकसित भारतासाठी मोदींच्या समर्थनार्थ हात बळकट व्हावेत, यामुळे भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी आलेल्या आदेशाचे पालन करून महायुतीच्या उमेदवारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले.

# कुंडलिकेत रंगल्या शिडाच्या होड्यांच्या शर्यती

**रेवदंडा, रोहा : प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या खारापटी येथील शिडाच्या होड्यांच्या स्पर्धेचा थरार याही वर्षी रोहेकरांना पहावयास मिळाला आहे. गुढीपाडव्यानिमित्त मंगळवारी दुपारी कुंडलिका नदीच्या पात्रात शिडाच्या होडीची स्पर्धा घेण्यात आली.

गणेश आळी मित्र मंडळ ग्रामस्थांच्या वतीने आयोजित होडी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. खालू बाजाचा ठेका, कुंडलिका नदीला आलेले उधाण व डोक्यावर सूर्यनारायणाच्या साक्षीने कोळी बांधवांचा जल्लोष या स्पर्धेच्या निमित्ताने पहावयास मिळाला. दुपारी होड्यांचा थरार पाहण्यासाठी कोळी बांधवांची नदी काठी गर्दी उसळली होती. लाकडी व फायबर या दोन प्रकारात होड्यांची स्पर्धा भरवण्यात आली होती.

लाकडी होडी स्पर्धेत प्रथम क्रमांक महालक्ष्मी एक्सप्रेस विनोद दाभाडे, द्वितीय क्रमांक आई साळबादेवी प्रसन्न, तृतीय क्रमांक एकविरा प्रसन्न वामन शेळके, तर फायबर होडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मरूआई प्रसन्न कृषणा मुरेकर, द्वितीय क्रमांक आई साळबादेवी प्रसन्न द्वारकानाथ पोकळे, तृतीय क्रमांक वैजयंती एक्सप्रेस प्रकाश पोकळे, चतुर्थ क्रमांक कोकणकन्या सुशील डोलकर यांनी पटकावला. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.



# विशेष मुलांच्या शाळेत वाढदिवस साजरा




**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील विनायक येथील ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळेचे विश्वासभाई यांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही अध्यात्मातून समाजसेवा या उद्देशाने उरण बोरी येथील स्वामी ब्रम्हानंद प्रतिष्ठानच्या सीबर्ड विशेष मुलांच्या शाळेत नुकताच आपला वाढदिवस साजरा केला.

शाळेला मदत म्हणून एक हजार १११ रुपयांचा धनादेश शाळेच्या पर्यवेक्षिका माधुरी उपाध्ये यांच्याकडे सुपूर्द केला. त्याचप्रमाणे शाळेतील ४० मुलांना फळे व फ्रुटी वाटप केली.

या वेळी ब्रम्हाकुमारी गीता पाठशाळेचे विश्वासभाई, शाळेच्या पर्यवेक्षिका माधुरी उपाध्ये, भारती बेहन, रेशमा कुंजवटे, मंजू बेहन, स्टाफ, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# लॅपटॉपसह ५० हजार रुपयांच्या रकमेची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

गाडीची काच फोडून लॅपटॉपसह ५० हजार रुपयांची रक्कम चोरल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे.

नदीम तशरीफ शेख हे खारघर सेक्टर २०मध्ये गाडी पार्क करून एका दुकानात कपडे घ्यायला गेले, मात्र परत आल्यावर त्यांच्या गाडीच्या मागच्या बाजूची काच फोडून त्यातील लॅपटॉप, बँक पासबुक तसेच आवश्यक ओळखपत्र व गाडीतील ४० हजार रुपयांची रोकड असा एकूण ५० हजारांचा मुद्देमाल चोराने लंपास केल्याचे लक्षात येताच नदीम यांनी खारघर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास खारघर पोलीस करीत आहेत.

## निवडक

### श्री स्वामी समर्थ प्रकटदिन सोहळा



**पनवेल** : प. पु. सद्‌गुरु नाना महाराज परांजपे यांच्या कृपाशिर्वादाने श्री स्वामी समर्थ मठ (मंदिर) गावदेवी पाडा येथे श्री स्वामी समर्थ महाराज प्रकटदिन सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा झाला. यानिमित्ताने मठाधिपती गुरुवर्य सुधाकर घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटे श्रींची काकड आरती, नित्य पूजा प्रसाद, लघुरुद्र पूजा, सद्‌गुरू पाद्यपूजा, श्रींची आरती व प्रसाद, श्री वृत्तगायत्री होमहवन, प्रकट दिन सोहळा, श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत पोथीचे सामुहिक पारायण, श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन, प. पू. गुरुवर्य सुधाकर घरत प्रवचन, श्रीस्वामींची महाआरती व उपस्थिती हजारो स्वामी सेवकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, तसेच श्रीस्वामी समर्थ भजन मंडळातर्फे भजनाचे आयोजन करण्यात आले होते.

### शांततेसाठी श्री शतचंडी महायज्ञ

**पनवेल** : जागतिक शांततेसाठी सलग तीन दिवस श्री शतचंडी महायज्ञाचे आयोजन पनवेल येथील प. पू. सद्‌गुरु श्री साई नारायण बाबांच्या आशीर्वाद श्री साई बाबा मंदिर, पनवेल येथे करण्यात आले आहे. १४ ते १६ एप्रिल असे सलग तीन दिवस या श्री शतचंडी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. महायज्ञाला सकाळी ७.३० तर तरी ८ वा. पर्यंत सुरू राहणार आहे. या महायज्ञामध्ये मोठ्या प्रमाणात भाविक सहभाग घेणार असल्याने अत्यंत नियोजन पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती चेअरमन खेमचंद गोपलानी, कोऑडिटर राम थदानी व सचिव रामलाल चौधरी यांनी दिली आहे.

### दुचाकीसह रोख रकमेची चोरी

**पनवेल** : चायनीज हॉटेलच्या गल्ल्यामधून रोख रक्कम व दुचाकी चोरून नेल्याप्रकरणी सैफ शेख या कुकविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण गुंजाळ यांचे पनवेल रेल्वेस्टेशनजवळ एचडीएफसी बँकेच्या एटीएमच्या बाजूला चायनिजचे दुकान आहे. या चायनीजवर त्यांनी सैफ शेख हा कुक कामासाठी ठेवला होता. गुंजाळ यांनी पैसे दुकानाच्या ड्रॉवरमध्ये ठेवले होते. ते पैसे न सापडल्याने त्यांनी कुक सैफ शेखला संपर्क साधला, मात्र झाला नाही, तसेच तो हॉटेललाही परत आला नाही. त्यामुळे गुंजाळ यांनी त्याच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# ११ दुचाकी चोरणारे त्रिकुट गजाआड

## लाखो रुपयांच्या दुचाकी जप्त



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल, कामोठे व नवी मुंबई परिसरातील दुचाकींची चोरी करून त्या खुल्या मार्केटमध्ये कमी भावात विकून त्या पैशावर अय्याशी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात खांदेश्वर पोलिसांना यश आले आहे. पकडलेल्या तीन आरोपींकडून खांदेश्वर पोलिसांच्या पथकांनी लाखो रुपयांच्या ११ दुचाकी जप्त केल्या आहेत. या दुचाकींमध्ये पाच बुलेटचादेखील समावेश आहे.

जगदीश चुन्नीलाल माळी (वय २४, रा. पुणे), प्रवीण रामलाल सीरवी (वय २५, रा. विचुबे गाव, पनवेल), अरविंदकुमार भवरलाल हिरागर (वय २४, रा. कामोठे) असे पकडलेल्या तीन संशयित आरोपींची नावे आहेत. हे तिन्ही संशयित आरोपी दिवसा खासगी नोकरी करायचे आणि रात्री दुचाकी चोरणाऱ्याची कामे करायची या तिन्ही आरोपीकडून खांदेश्वर पोलिसांनी जवळपास ११ दुचाकी जप्त केल्या आहेत, या दुचाकींमध्ये पाच बुलेटचादेखील समावेश आहे.

या तीन संशयितांपैकी कामोठे वसाहतीमध्ये राहणारा अरविंदकुमार हिरागर हा पनवेल तसेच नवी मुंबई परिसरात डिलिव्हरी बॉय म्हणून काम करायचा, तसेच विचुंबे येथील प्रवीण सिरवी हादेखील खासगी सप्लायर म्हणून काम करायचा. हे काम करताना, सोसायटीच्या आवारात तसेच रेल्वेस्टेशनच्या आवारात पार्किंग करून ठेवलेल्या गाड्यांवर लक्ष ठेवून असायचे. रात्री याच दुचाकी चोरून पोबारा करायचे. अशप्रकारे या संशयित आरोपींनी खांदेश्वर पोलीस स्टेशन आणि कामोठे तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरून नवी मुंबई शहरात दहशत माजवली होती. या चोरांना पकडणे नवी मुंबई पोलिसांसाठी आव्हान झाले होते. या दुचाकी चोरीबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत लांडगे तसेच पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर चासकर आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक समिर बरकडे असे दोन पोलीस पथके तयार करून, गुन्ह्याच्या तपासाला सुरवात केली. तपास सुरू केल्यानंतर सर्वच गुन्ह्यातील आरोपी एकच असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

पोलिसांनी अथक प्रयत्न करून नवी मुंबई, खांदेश्वर तसेच कामोठे शहरातील सीसीटीव्ही तपासणी करून आरोपींच्या हालचाली शोधण्यास सुरुवात केली आणि संशयित आरोपींच्या हालचालींवर लक्ष ठेवून पोलीस पथकातील हवालदार महेश कांबळे, भाऊराव बाचकर, धीरेंद्र पाटील, उदय देसाई, अमित पाटील तसेच अन्य पोलिसांच्या पथकांनी या दोन संशयीतांना नवीन पनवेलमधील शिवा कॉम्प्लेक्स येथून अटक केली.

तिसऱ्या संशयिताला पुणे येथून अटक केली. याची अधिक चौकशी केली असता, या चोरांनी या सर्व गाड्या पुणे, राजस्थान तसेच नवी मुंबई परिसरात विकल्या असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अवघ्या काही दिवसांतच जवळपास ११ दुचाकी राजस्थान, पुणे आणि नवी मुंबई येथे जाऊन ताब्यात घेऊन जप्त केल्या आहेत. या संशयितांकडून जवळपास ११ गुन्ह्यांची उकल खांदेश्वर पोलिसांनी केली आहे.

दुचाकी चोरणाऱ्या आरोपींमध्ये २४ वर्षीय डिलिव्हरी बॉयचा समावेश आहे. कामोठे वसाहतीमध्ये राहणारा हा डिलिव्हरी बॉय अरविंदकुमार सामानाची डिलिव्हरी करीत सोसायट्या तसेच रेल्वे स्टेशनच्या आवारात पार्कींग करून ठेवलेल्या दुचाकींवर लक्ष ठेवायचा. रात्री अंधाराचा फायदा घेऊन मित्राच्या मदतीने त्याच दुचाकी चोरायचा. यांच्या अटकेमुळे अजूनही दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता खांदेश्वर पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहेत.

## महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून पसार झालेले दोघे ताब्यात

**पनवेल** : पनवेल एसटी डेपो ते खांदा कॉलनी असे रस्त्याने पायी जात असताना एका ६५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील १० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन जबरीने चोरून नेणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सुवर्णा लांजेकर (वय ६५ रा. खांदा कॉलनी) या पनवेल एसटी डेपो ते खांदा कॉलनी असे रस्त्याने पायी जात असताना आरोपी मोहित कोहली (वय २३) व करण कोहली (वय २२) या दोघांनी आपसात संगनमत करून त्यांच्या गळ्यातील जवळपास ५० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन जबरी चोरी करून पळवून नेली होती. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व गुन्हे शाखेच्या पथकाने दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## मद्यविक्री करणाऱ्यावर कारवाई

**पनवेल** : मद्यविक्री करणाऱ्या संतोष खैरे (५३ रा. करंजाडे) याच्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. करंजाडे, सेक्टर ६ येथील किराणा दुकानामध्ये एक व्यक्ती विनापरवाना मद्यविक्री करीत असल्याची माहिती पनवेल पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या वेळी किराणा दुकानामध्ये संतोष खैरे हे मद्यविक्री करीत असल्याचे दिसून आले. त्याच्याकडून हजारो रुपये किमतीचे मद्य जप्त करण्यात आले.

## भरधाव वेगाने जाणाऱ्या चारचाकीची डिवायडरला धडक; चालकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव वेगाने जाणाऱ्या हुंडाई आय २० गाडीची पनवेलजवळील खारपाडा येथील टोलनाक्याच्या डिवायडरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात कार चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्यानंतर गाडी जाळून खाक झाली आहे.



विजय शंकर राठोड (वय ४४, रा. पेण) त्यांच्या हुंडाई कंपनीची कार (एमएच ०६ बीयु ०८७५) ही भरधाव वेगात पनवेलकडून पेणकडे जात असताना खारपाडा टोलनाका येथील डिवायडरला ठोकर मारून अपघात करून पायाला, छातीला, डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाण्यात या गुन्हा नोंद करण्यात आली आहे.

## 'एल अँड टी'तर्फे गव्हाण विद्यालयास वॉटर कुलर भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

मारावे येथील एल अँड टी सिडको हौसिंग, मुंबई यांचे वतीने रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना पिण्याच्या शुद्ध आणि थंड पाण्यासाठी ब्ल्यू स्टार कंपनीचा आरओ प्लांट कुलर भेट देण्यात आला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि मोरावे येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भारतीय जनता पक्षाचे उलवे नोड भाग १चे अध्यक्ष मदन पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून एल अँड टी या कंपनीने विद्यालयास हा आरओ कुलर भेट दिला.



या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे आणि विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर यांच्या हस्ते मदन पाटील व एल अँड टी कंपनीचे स्टोर इन्चार्ज दिनेश कुमार यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. आरओ प्लांट आणि कुलर भेट दिल्याबद्दल एल अँड टी कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक करुणानिधी राजशेखर आणि अकौंटन्ट समीर नायक यांचे विद्यालयाच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ अध्यापिका चित्रलेखा पाटील, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, राजेंद्र चौधरी, गुरुकुल विभाग प्रमुख संदीप भोईर, शितलकुमार म्हात्रे, प्रशांत परदेशी, प्रमोद करावकर आदी उपस्थित होते.

## रमजाननिमित्त पनवेल पोलीस ठाण्यात बैठक

**पनवेल : वार्ताहर**

आगामी रमजान ईद सणानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील मशिदीचे ट्रस्टी व मौलाना यांची बैठक शहर पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कार्यालयात घेण्यात आली.

या बैठकीत बैठकीत रमजान ईद सण हा शांततेत व सुरक्षित खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावा. कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याने आचारसंहितेचा अधिसूचनाचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, आदी संदर्भातील मार्गदर्शन वपोनि नितीन ठाकरे यांनी केले.

बैठकीला गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव यांच्यासह २० मशिदी ट्रस्टचे १९ पदाधिकारी उपस्थित होते.







**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ आणि माजी नगरसेवक अजय बहिरा यांचा वाढदिवस बुधवारी उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मनोज भुजबळ आणि अजय बहिर यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, रघुनाथ बहिरा, प्रतिक बहिरा, राम सारंग, अमरीश सिंग, रुपेश परदेशी, सचिन परदेशी, शंकर म्हात्रे, महेश राऊत, प्रशांत फुलपगार, यतीन पाटील आदी उपस्थित होते.**

## सीकेटी महाविद्यालयात मतदार जागरुकतेसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी)आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) च्या राज्यशास्त्र विभाग, निवडणूक साक्षरता मंडळ आणि सांस्कृतिक विभाग तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मावळ लोकसभा अंतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ८) पनवेल तहसीलदार कार्यालय परिसरात महाविद्यालयाच्या चमूने उपस्थितांमध्ये मतदानाविषयी जागरूकता आणि महत्त्व पटवून देण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले.



महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा समूह सायंकाळी ५ वाजता पनवेल तहसीलदार कार्यालयात दाखल झाला. समूहाचे पनवेल तहसीलदार कार्यालयाच्या निवडणूक विभगाचे नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी संजय भालेराव यांनी स्वागत केले. सीकेटी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख तथा निवडणूक साक्षरता मंडळाचे समन्वयक प्रा. आकाश पाटील यांनी प्रास्ताविक मांडताना पनवेल तहसीलदार कार्यालय आणि सीकेटी महाविद्यालयाच्या ऋणानुबंधाचा उल्लेख करीत निवडणूक विभागाचे मतदार जागरुकतेसाठी असणाऱ्या सहकार्य आणि प्रोत्साहानाबाबत कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. औपचारिक स्वागत आणि अल्पोपहार झाल्यानंतर पनवेल तहसीलदार कार्यालयाचे निवडणूक विभागाचे प्रमुख संजय भालेराव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत आगामी लोकसभा निवडणूक प्रणाली, निवडणूक यंत्रणा, निवडणुकीचे आयोजन याबाबत इत्यंभूत माहिती देऊन सर्व विद्यार्थ्यांना निवडणुकीत मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले. व अंततः सांस्कृतिक कक्षाचे समन्वयक प्रा. गणेश जगताप यांनी संवाद सत्राचे आभार मानले.

विद्यार्थी संवाद झाल्यावर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कक्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रणव शेंडगेद्वारे लिखित आणि दिग्दर्शित प्रबोधनपर पथनाट्याचे सादरीकरण केले. ज्यात मतदान हा फक्त अधिकार नसून प्रत्येक भारतीय नागरिकाचे ते उत्तरदायित्व असून त्याचे निर्वाहन करणे परमकर्तव्य असल्याचा संदेश दिला. या वेळी तहसीलदार कार्यालयातील नायब तहसीलदार संजय भालेराव, सुरज कचरे, अनिकेत पंडित, कांबळे, सारिका आव्हाड व कर्मचारीवर्ग आणि नागरिक उपस्थित होते.

प्रस्तुत विस्तार आणि बहि:शाल उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यायाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख तथा निवडणूक साक्षरता मंडळाचे समन्वयक प्रा. आकाश पाटील व सांस्कृतिक कक्षाचे समन्वयक प्रा. गणेश जगताप यांच्यासमवेत सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



**कळंबोली : व्यावसायिक सचिन साळुंखे यांनी ग्रिमग्रुम प्रीमियम लॉन्ड्री अँड ड्रायक्लिन हा नवीन व्यवसाय सुरू केला आहे. त्याचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, पनवेल मनपा माजी नगरसेवक अमर पाटील, कामोठे सरचिटणीस हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# बिनशर्त विकासाचा मंत्र

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने भाजपला जो पाठिंबा दिला आहे, तो नैसर्गिकच मानला पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर भाजप असो, मुख्यमंत्री शिंदे यांची शिवसेना असो किंवा राज ठाकरे यांची मनसे असो, या तिन्ही पक्षांचा डीएनए एकच आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने देखील विकासाच्या मुद्यावरच सत्तेत सामील होण्याचा निर्णय घेतला होता.

**समविचारी पक्षांनी एकत्र यावे आणि देशाच्या विकासाचा मंत्र जपत एकत्रित वाटचाल करावी हेच तर लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे. देशपातळीवर विरोधकांची तथाकथित 'इंडी आघाडी' असो किंवा राज्य पातळीवर 'महाभकास आघाडी' असो, परस्परांना घट्ट धरून जनतेच्या रोषापासून स्वत:ची कातडी वाचवणे हा त्यांचा एकमेव उद्देश आहे. तो जनतेपासून लपून राहिलेला नाही. उलटपक्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने देशाच्या विकासाचा जो महायज्ञ मांडला, त्याला राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील अनेक पक्षांनी मनापासून हातभार लावला. विकासासाठी कुठल्या अटीशर्ती नसतात. देशप्रेमाने भारलेल्या मनांमध्ये अशा अटीशर्ती डोकावू शकत नाहीत. म्हणूनच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे अभिनंदनास पात्र ठरतात. कुठल्याही पदाचा लोभ न ठेवता, कुठल्याही अटीशर्ती न घालता, त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी संध्याकाळी मनसेच्या मेळाव्यात नेमकी कुठली घोषणा होणार याची उत्कंठा ताणली गेली होती. काही महिन्यांपूर्वी राज ठाकरे यांनी हिंदुत्वाचा झेंडा धडाडीने हाती घेतला. शिवसेनेची शकले झाल्यानंतर बरेचसे कडवे शिवसैनिक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागे उभे राहिले तर उरलेसुरले उद्धव ठाकरे यांच्या मागे गेले. या पक्षाची शकले उडाली ती काही फारशी सुखद बाब नव्हती. परंतु उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व आणि विकास या दोन्ही अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांना तिलांजली देत काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी नवा घरोबा केला. उद्धव ठाकरे यांनी सोडलेले हिंदुत्व त्यांचे चुलत बंधू राज ठाकरे यांनी उचलून धरले. विकासाच्या मुद्यावर ते किती आग्रही आहेत हे साऱ्या महाराष्ट्राला माहीत आहेच. हिंदुत्व आणि विकासाच्या मुद्यावर राज ठाकरे यांच्याशी भाजपच्या नेत्यांची जवळीक वाढली नसती तरच नवल होते. आपला देश जागतिक स्तरावर वेगाने वाटचाल करत असताना, आणि नवनवे लौकिक मिळवत असताना एकदिलाने आणखी जोरात प्रयत्न करणे हे खरे तर साऱ्यांचेच कर्तव्य आहे. यामध्ये राजकीय पक्ष आले तसेच सामान्य नागरिकही. पक्षभेद विसरून देशाच्या विकासासाठी संयुक्तपणे दमदार वाटचाल व्हावी असे प्रत्येकालाच वाटते. अर्थात, अपवाद काँग्रेस आणि त्यांच्या घमंडिया आघाडीचा. मोदीद्वेषाच्या लाटेवर ही मंडळी अशी काही स्वार झाली आहेत की त्यांना मोदी द्वेष कुठे संपतो आणि देशाचा विरोध कुठे सुरू होतो हेच कळेनासे झाले आहे. राज ठाकरे यांनी नेमके तेच टाळले असे म्हणावे लागेल. शिवाजी पार्क येथे झालेल्या मनसेच्या मेळाव्यात राज ठाकरे यांनी बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यानंतर भाजपच्या गोटात आनंदाचे भरते आले, तेव्हाच महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. राज ठाकरे यांच्यासारखा तोफखाना महायुतीच्या गोटात सामील झाल्यामुळे आधीच कमकुवत झालेली महाविकास आघाडी गर्भगळीतच झाली आहे.**

# पोलादपूरातील हिंदू-मुस्लिम बांधव एकात्मतेचे प्रतिक



## खबरबात
शैलेश पालकर

पोलादपूर तालुक्यातील कालवली जामा मशिदीत लक्ष्मीपूजन दिवाळीला हिंदूबांधवांनी नमाज पढण्याची ६५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून परंपरा अस्तित्वात असल्याचे दिसून आले. सोबतच भोराव, कणगुले, माटवण, सवाद, वावे, धारवली, कालवली या सात गावांच्या सप्तक्रोशीतील बौध्द, हिंदू मुस्लीम बांधवांचे ऐक्य आणि आजमितीस कधीही दंगल न झाल्याची वस्तुस्थिती पाहता 'वसुधैव कुटूंबकम्।' अथवा 'विश्वात्मके देवे' या संकल्पना वेगळ्या नसाव्यात, असे ठाम मत निर्माण होऊ शकते.

या सात गावांच्या ग्रामस्थांची सप्तक्रोशी संघटना विविध कामांसाठीचा पाठपुरावा, चुकीच्या प्रथा परंपरा तसेच बेकायदा कृत्यांसाठी सात गांवाच्या बैठकीतून सामंजस्य प्रस्थापित करीत असतात. सप्तक्रोशीतील राजकारणाचे आणि सामाजिक धार्मिक ऐक्याचे एकाच मुशीतून व्यक्त होण्याचे आगळेवेगळेपण यालाच वसुधैव कुटूंबकम्। अथवा 'विश्वचि माझे घर' म्हणता येईल. सप्तक्रोशीच्या विकासाकरिता उपोषण, आंदोलन तसेच निवेदने देणारे हे सप्तक्रोशीतील नागरिक सवाद येथील शंभूमहादेवाच्या यात्रेमध्येही सप्तक्रोशी युवक संघटनेच्या माध्यमातून सर्व यात्रेकरूंना मोफत शीतपेयजल पाजण्यासाठी नियोजनबध्द प्रयत्न करीत असतात. यामध्ये हिंदू, मुस्लिम आणि बौध्द बांधवांचे एकत्र वावरणे हे सर्वधर्मसमभावाचे नव्हे तर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असल्याचे जाणवते.

संपूर्ण भारतात हिंदू मुस्लिम ऐक्यासंदर्भात वेगवेगळ्या घटनांची चर्चा असताना पोलादपूर तालुक्यातील कालवली जामा मशिदीत चक्क ६५ वर्षांपेक्षा अधिक काळापासून हिंदूबांधव नित्यनेमाने दरवर्षी न चुकता नमाज अदा करीत असल्याची आश्चर्यजनक परंपरा उघडकीस आली आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने यावर्षी या परंपरेची प्रत्यक्ष खात्री केल्याने ही लक्ष्मीपूजन दिवाळीला होणारी नमाज हिंदू मुस्लिम आपसातील सदभावनेचे प्रतीक म्हणून संपूर्ण भारतवर्षात चर्चेत येण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील कालवली जामा मशिदीमध्ये हिंदू बांधवांच्या एका दैवी विचारांचा एक गट दरवर्षी लक्ष्मीपूजन दिवाळीच्याच दिवशी नमाज अदा करीत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. यामुळे या जामा मशिदीमध्ये सकाळी अकरा वाजताच उपस्थित राहून या परंपरेची खातरजमा करण्याचे ठरविले.

चिखलीतील बांदल यांचे काळवलीतील शिष्य गुरूवर्य सदूबाबू पार्टे तथा पार्टे बाबा आणि नानाबाबा वलीले यांच्यातील सख्य कसे झाले याबाबत कोणासही काहीही माहिती नाही, मात्र नानाबाबा वलिले यांची ही परंपरा आजही कायम ठेवण्यास कालवली ग्रामस्थांनी सहकार्य केले आहे. या परंपरेला गुरूशिष्य परंपरा म्हणावे अथवा मैत्री संबंध याबाबतही बुजूर्ग काही सांगू शकत नाहीत, मात्र जो मंत्र सिध्द करायचा असतो; तो सोनू महमदच्या शाळेमध्ये म्हणजे मशिदीमध्ये नमाज पढूनच सिध्द होईल, असा उल्लेख गुरूवाणीमध्ये असल्याने गेल्या सुमारे ६५ वर्षांहून अधिक काळ याठिकाणी या विचारांच्या तीन तालुक्यांमध्ये विखुरलेल्या हिंदू बांधवांकडून लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नमाज अदा केली जाते, असे या वेळी उपस्थित बुजूर्ग हिंदू बांधव आप्पा पार्टे यांनी सांगितले. सध्या गुरूवर्यांच्या सुनबाई असल्याची माहिती या वेळी अधिक विस्तृतपणे बोलण्याचे टाळून या बुजूर्गाने सांगितली.

या पार्टेबाबांच्या शिष्यगणांपैकी भिवा पवार यांनी, काळवली, धारवली, हावरे, सवाद, मोरसडे, निगडे, करंजाडी, रूपवली, बारसगांव, कातिवडे, तुर्भे, तुर्भे खोंडा तसेच सुमारे तीन तालुक्यांमध्ये या शिष्यगणांचे अस्तित्व आहे. दरवर्षी सुमारे ३०-३५ लोकांचा समुदाय या ऊर्दू सोनू महमद शाळेमध्ये म्हणजेच मशिदीमध्ये नमाज अदा करून एक कोंबडा देतो आणि आमच्या गुरूंच्या काळवलीतील समाधीस्थळी जाऊन मंत्र सिध्द करतो, अशी माहिती दिली. हा शिष्यपरिवार आजार उपचार यापेक्षाही बंदोबस्तासंदर्भात आग्रही असल्याने या मंत्रसिध्दीनंतर अनेक शिष्यमंडळी आजार रोगापासून दूर राहतात, असे मत एका शिष्याने व्यक्त करून वेळप्रसंगी डॉक्टरी इलाज उपचार करण्यासही शिष्य तयार असल्याने यास अंधश्रध्दा म्हणता येणार नाही, असे मत मांडले.

या वेळी कालवली वलीले मोहल्ल्यातील अब्दुलहक खलफे, महमद उस्मान खलफे, मुराद इब्राहिम वलिले, अब्दुर्रज्ञाक खलफे, कालवली गावाचे इमाम मौलाना अखलाख यांनी सर्व हिंदू बांधवांचे दरवर्षीप्रमाणे नमाज पठण केल्याबद्दल आनंद व्यक्त करून ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्याहस्ते हिंदूबांधवांना भेटवस्तू प्रदान केल्या. आगामी अनेक पिढयांमध्ये ही परंपरा कायम ठेवण्याची भूमिका या वेळी बुजूर्ग आप्पा पार्टे यांनी मांडली असता वलीले मोहल्यांतील मुस्लीम बांधवांनी जामा मशिदीमध्ये नमाज पढण्यास दरवर्षी स्वागत असल्याचे आवर्जून सांगितले.

रमजान महिना काय आहे? इद उल फित्र अथवा रमजान इद काय आहे? : हा तो महिना आहे ज्यामध्ये असे मानले जाते की, पवित्र कुरआन स्वर्गातून पुरुष आणि स्त्रियांसाठी मार्गदर्शन, दिशा घोषणा आणि तारणाचे साधन म्हणून खाली उतरवले गेले. या महिन्यात मुस्लिम लोक पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत कडक उपवास करतात.

रमजान, इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, जगभरातील मुस्लिम उपवासाचा महिना म्हणून पाळतात (सॉम), प्रार्थना, प्रतिबिंब आणि समुदाय. मुहम्मद (सल्ल)च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून, रमजानचे वार्षिक पाळणे इस्लामच्या पाच स्तंभांपैकी एक मानले जाते आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते.

पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे हे सर्व प्रौढ मुस्लिमांसाठी फरद (अनिवार्य) आहे जे तीव्र किंवा दीर्घकाळ आजारी नसलेले, प्रवास करणारे, वृध्द, स्तनपान करणारे, मधुमेहकिंवा मासिक पाळीत आहेत. पहाटेच्या जेवणाला सुहूरअसे संबोधले जाते आणि रात्रीच्या जेवणाला इफ्तार म्हणतात. मध्यरात्री सूर्य किंवा ध्रुवीय रात्र असलेल्या प्रदेशात राहणाऱ्या मुस्लिमांनी मक्काचे वेळापत्रक पाळावे, असे फतवे जारी केले गेले असले तरी, सर्वांत जवळच्या देशाचे वेळापत्रक पाळण्याची प्रथा आहे ज्यात रात्र दिवसापासून वेगळी केली जाऊ शकते. असे मानले जाते की उपवासाचे आध्यात्मिक बक्षिसे (थवाब) रमजानमध्ये वाढतात. त्यानुसार, मुस्लिम केवळ खाण्यापिण्यापासूनच नव्हे तर तंबाखूजन्य पदार्थ, लैंगिक संबंध आणि पापी वर्तनापासूनही परावृत्त करतात नमाज (प्रार्थना) आणि कुराण पठण करण्याऐवजी स्वत:ला समर्पित करतात.

मुस्लिमांना रमजानच्या २९ ते ३० दिवसांपैकीप्रत्येक दिवशी उपवास करणे आवश्यक आहे. उपवास करू शकत नसल्यास, रमजानच्या बाहेर दान किंवा उपवास करणे पुरेसे आहे. पहाटेचे जेवण हे सामान्य आहे आणि एक अत्यंत गुणवान प्रथा मानली जाते.

रमजान हा आध्यात्मिक चिंतन, आत्म-सुधारणा आणि उच्च भक्ती आणि उपासनेचा काळ आहे. मुस्लिमांनी इस्लामच्या शिकवणींचे पालन करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे अपेक्षित आहे. उपवास (सॉम) पहाटेपासून सुरू होतो आणि सूर्यास्तानंतर समाप्त होतो.

रमजान इस्लामी दिनदर्शिकेनुसार नववा महिना असतो. रमजान महिन्याचा पहिला दशक 'कृपेचा', दुसरा दशक 'क्षमेचा', तिसरा आणि अंतिम दशक नरकापासून 'मुक्ततेचा' मानला जातो. या काळात अल्लाह त्यास क्षमादान देईल व नरकापासून सुटका करून मुक्ती देईल. त्यामुळे वर्षभरातील अन्य अकरा महिन्यांत मिळणा नेकी (पुण्याई) पेक्षा रमजानमध्ये मिळणारी नेकी ही ही तब्बल सत्तर पटीने जास्त असते. त्यामुळे मुस्लिम बांधव जास्तीतजास्त नेकी कमाविण्यासाठी पवित्र रमजान महिन्यात संसार, व्यापार आदींचा त्याग करून अल्लाहस शरण जातात. 'रमजान' मांगल्याचे प्रतिक आहे. त्यामुळे याला कृपाप्रसादाचा महिनाही म्हणतात.

रमजान म्हणजे बरकती आणि इद म्हणजे आनंद असा अर्थ असून परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणाऱ्या या महिन्याच्या शेवटच्या दिवशी इद उल फित्र असेही म्हणतात. चंद्रदर्शनाने ही इद साजरी केली जाते.



## बदलते तंत्रज्ञान

### फेसबुक लवकरच देणार इन्स्टाग्राम रील्सला टक्कर!

फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप, इन्स्टाग्राम, एक्स आदी अनेक अ‍ॅप आहेत, जिथे आपण फिरायला गेलो की, फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करतो तसेच इतरांचेही स्टेट्स पाहतो. या तिन्ही अ‍ॅपवर फोटो आणि व्हिडीओ पोस्ट करण्यासाठी आणि पाहण्यासाठी वेगवेगळे फीचर्स आणि डिझाइन आहेत. त्यात एखादा व्हिडीओ फेसबुकवर बघायचा असेल तर फेसबुकच्या होम पेजवर दिसणाऱ्या व्हिडीओ प्लेयर पर्यायावर क्लिक करावे लागते. त्यानंतर तुम्ही फॉलो केलेल्या विविध पेजचे एका खाली एक व्हिडीओ दिसू लागतात. तर हे व्हिडीओ तुम्हाला आडवे दिसतात, पण हा प्रत्येक व्हिडीओ बघून झाल्यानंतर पुन्हा मागे जाऊन दुसरा व्हिडीओ ओपन करावा लागतो. आता युजर्सना चिंता करण्याची गरज नाही, कारण कंपनी टिकटॉक आणि इन्स्टाग्रामसारखे अपडेट फेसबुकसाठी घेऊन येणार आहे.



मेटा मालकीच्या फेसबुकने जाहीर केले आहे की, मोबाइल डिव्हाइससाठी अपडेटेड व्हिडीओ प्लेयर आणणार आहेत, जो आता इन्स्टाग्राम रिल्स आणि टिकटॉकसारख्या उभ्या विंडोमध्ये म्हणजेच (व्हर्टिकल) ओपन होईल. कंपनीचे म्हणणे आहे की, रील्स, मोठे व्हिडीओ आणि लाइव्ह कन्टेन्ट आदी अनेक गोष्टी तुम्हाला फुलस्क्रीनवर पाहण्याचा आकर्षक अनुभव देण्याची कंपनी योजना आखत आहे.

व्हिडीओ प्लेयर अपडेटनंतर फेसबुक पमध्ये फीडमधून स्क्रोल करताना तुम्हाला फुलस्क्रीन व्हर्टिकल व्हिडीओ दिसतील. आतापर्यंत फेसबुक अ‍ॅप डिव्हाइस आणि व्हिडीओच्या लांबीनुसार आडवे व्हिडीओ दाखवत होता, तर अपडेटनंतर तुमचा फोन फ्लिप करून तुम्ही नेहमी लँडस्केप मोडमध्ये व्हिडीओ पाहू शकता.

या अपडेटला पाहता असे दिसते की, फेसबुकने इन्स्टाग्राम अ‍ॅपशी प्रेरणा घेतली आहे. नवीन व्हिडीओ प्लेअरचा लूक सारखाच असला तरीही त्यात नवीन प्लेबॅक कंट्रोल्स असणार आहेत; जसे की व्हिडीओच्या खाली दिसणाऱ्या स्लाइडरचा वापर करून तुम्ही व्हिडीओचा आवडता पार्ट प्ले करू शकता तसेच व्हिडीओ दहा सेकंद मागे किंवा पुढेसुद्धा करू शकता. व्हिडीओची लांबीसुद्धा वाढवण्यात आली आहे. नवीन व्हिडीओ प्लेयर पहिल्यांदा युनायटेड स्टेट्स आणि कॅनडामध्ये राहणाऱ्या वापरकर्त्यांसाठी रोलआउट केला जाईल आणि त्यानंतर येत्या काही महिन्यांत सर्वत्र रोलआउट करण्यात येईल. त्यामुळे फेसबुक रील्सला टक्कर देईल, असे म्हणायला हरकत नाही.

# समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले

## निमित्त



महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाजसुधारक आणि विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांसा करणारे क्रांतिकारक विचारवंत म्हणजे महात्मा जोतीराव गोविंदराव फुले. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सावता माळी समाजातील गोविंदराव शेटिबा फुले आणि चिमणाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला. मूळचे गोऱ्हे हे उपनाव बदलून फुलांच्या धंद्यामुळे फुले हे नाव पडले. जोतीरावांच्या लहानपणीच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांच्या पालनपोषणाचा सर्व भार वडिलांवरच पडला.

जोतीरावांना इंग्रजी शिक्षणाचा वेध लागला होता. त्यात अनेक अडचणी आल्या, तरी शालांत परीक्षेइतके इंग्रजी शिक्षण त्यांनी पुरे केले. इंग्रजीतील उच्च दर्जाचे ग्रंथ समजण्याची पात्रता तसेच इंग्रजीत लेखन करण्याची क्षमताही त्यांनी प्राप्त करून घेतली. बौद्धिक शिक्षणाबरोबरच शरीरशिक्षणही घेतले. लहूजीबुवा मांग यांच्यापाशी दांडपट्टा शिकले, मल्लविद्या संपादन केली. शिक्षण पुरे केल्यावर १८४०मध्ये जोतीरावांचा विवाह सातारा जिल्ह्यातील नायगाव येथील खंडोजी नेवसे-पाटील यांची कन्या सावित्री हिच्याशी झाला. सावित्रीबाईंचे शिक्षण जोतीरावांनीच पुरे केले. त्या स्वयंस्फूर्तीने जोतीरावांच्या समाजसुधारणेच्या आणि लोकशिक्षणाच्या कार्यात जन्मभर सहभागी झाल्या.

जगाचा, पश्चिमी देशांचा व विशेषतः भारताचा प्राचीन, अर्वाचीन इतिहास जोतीरावांनी इंग्रजीमधून वाचला आणि सखोलपणे त्यावर मनन केले. अमेरिकन राज्यक्रांतीच्या इतिहासाची त्यांच्या मनावर खोल छाप पडली. द राइट्स ऑफ मॅन (१७९१-९२) या टॉमस पेन (१७३७-१८०९) याच्या ग्रंथाची त्यांनी अनेक पारायणे केली. मानवी समतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्येयवाद आत्मसात केला. या तत्त्वांच्या आधारे ते भारतीय समाजाचे उत्कृष्ट चिंतन करू शकले. संस्कृत ग्रंथही त्यांनी वाचले. वेद, स्मृती, पुराणे यांच्यातील कथांचा अभ्यास केला. कबीराच्या बीजक ग्रंथातील 'विप्रमति' या प्रकरणाचा त्यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडला. त्यांनी एका ठिकाणी स्वतःचा 'कबीर साधूच्या पंथाचा' असा निर्देश केला आहे. अशा चिंतन मननाने त्यांची भारतीय समाजक्रांतीची विचारसरणी तयार झाली. जगातील क्रांतिकारकांच्या नेत्यांमध्ये शोषित समाजातून पुढे आलेले यांच्यासारखे नेते फार थोडे, कार्ल मार्क्स, लेनिन इ. मध्यमवर्गीय नेते कामगारक्रांतीचे पुरस्कर्ते झाले. फुले, आंबेडकर हे शोषित समाजातून निर्माण झाले. हे त्यांचे वैशिष्ट्य होय.

जोतीरावांनी आपल्या विचारांचा एक सुबोध व सुंदर, सूत्रबद्ध सारांश सांगितला आहे.. ''विद्येविना मति गेली मतीविना नीति गेली नीतीविना गति गेली! गतीविना वित्त गेले वित्ताविना शूद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.'' त्यांनी हा निष्कर्ष शेतकऱ्याचा आसूड (१८८३)मध्ये प्रारंभी सांगितला आहे.

जोतीराव फुले यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई (१८३१-९७) यांनी अनन्यभावाने आयुष्यभर सहकार्य दिले. स्त्रीमुक्तिआंदोलनाची महाराष्ट्रातील पहिली अग्रणी म्हणून महाराष्ट्राचा आधुनिक इतिहास त्यांची दखल जरूर घेईल. जोतीरावांची सगळी विचारसरणी त्यांनी आत्मसात केली होती. २८ नोव्हेंबर १८९० रोजी जोतीराव यांचे निधन झाले. त्यानंतरही सत्यशोधक समाजाच्या आंदोलनाची धुरा सावित्रीबाईंनी वाहिली. (साभार : मराठी विश्वकोष)

## क्लिक...क्लिक...!

(छाया : तन्वी पवार)




पनवेल : सायंकाळी उन्हाच्या झळा कमी झाल्यावर अनेक मुले शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानावर क्रिकेट खेळतात.

## आरोग्य प्रहर

### घामाची दुर्गंधी दूर करण्याचे बेस्ट उपाय

उन्हाळा सुरू झाला की, घामामुळे लोक हैराण होतात. सोबतच घामाच्या दुर्गंधीमुळे त्यांना आणि इतरांनाही त्रास होते. अशात चार चौघात जाण्यासही भिती वाटते. त्यामुळे घामाच्या दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी आम्ही काही घरगुती उपाय तुम्हाला सांगणार आहोत...



आधी जाणून घेऊया घामाच्या दुर्गंधीची कारणे. फार जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्यानेही शरीराची दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे उन्हाळ्यात जास्त मसालेदार पदार्थ खाणे टाळावेत. तणाव असल्यावर शरीरातून घाम अधिक निघतो. यादरम्यान शरीरात कॉर्टिसोल हार्मोन अधिक रिलीज होतात. ज्यामुळे असं होतं. जास्त प्रमाणात निघालेला घाम जेव्हा बॅक्टेरियाच्या संपर्कात येतो तेव्हा दुर्गंधी येऊ लागते. जर तुम्ही फार जास्त औषधे घेत असाल तर याचा प्रभाव तुमच्या शरीरावरही होतो. औषधांमधील रासायनिक तत्व शरीराच्या गंधाला प्रभावित करतात. अशात घाम आणि शरीराचा गंध मिळून दुर्गंधी निर्माण होते.

आंघोळीच्या पाण्यात काही थेंब गुलाबजल टाका. गुलाबजल एक नॅचरल कुलर आहे. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच तुम्ही घामाची दुर्गंधी दूर करण्यासाठी अंडरआर्ममध्ये बटाट्याच्या स्लाइसने रब करा. यानेही दुर्गंधी जाते.

आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी फिरवा किंवा पदीन्याची पाने बारीक करून टाका. यानेही घामाची दुर्गंधी दूर होण्यास मदत मिळते.

बेकिंग सोड्याचा तुम्ही टॅल्कम पावडरच्या रूपात वापर करू शकता. बेकिंग सोडा एक पाण्यात मिक्स करा आणि हे पाणी, काखेत, पायांच्या बोटांच्या मधे लावा. यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे बेकिंग सोडा टाका. कपडे घालण्याआधी हे मिश्रण घाम येणाऱ्या भागांवर लावा.

पाणी उकडून घ्या आणि त्यात ग्रीन टी ची काही पाने टाका. हे पाणी थंड झालं तर कॉटनच्या मदतीने ते घाम येणाऱ्या भागात लावा. चहा त्वचा शुष्क आणि गंधमुक्त ठेवण्यास मदत करते. याचा वापर तुम्ही आठवड्यातून दोनदा करा.

एज कप ताजा टोमॅटोचा रस घ्या आणि तो एक बकेट पाण्यात टाका. या पाण्याने आंघोळ करा. टोमॅटोमधील अँटीसेप्टीक गुण कोणत्याही प्रकारचा गंध निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाला नष्ट करण्यास मदत करतो.

लिंबू त्वचेची पीएच लेव्हर संतुलित करण्यास मदत करतं. दोन मोठे चमचे कॉर्नस्टार्च आणि लिंबाचा रस घेऊन पेस्ट तयार करा. ही पेस्ट काखेत लावा आणि १० मिनिटांनी ती स्वच्छ करा.

# विजेच्या धक्क्याने माकडे दगावली

## १५ दिवसांत चार घटना

**खालापूर : प्रतिनिधी**

एप्रिलच्या पहील्या आठवड्यातच जंगल भागातील पाण्याचे झरे व डबकी आटल्याने मुके प्राणी व पक्षी जंगल सोडून शहरातील पाणी साठवण टाक्या व मनुष्य रहीवाशी भागाकडे सरकू लागले आहेत तसेच तालुक्यातील शहरातील विद्यूत पुरवठा तारांचा शॉक लागून दगावण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. मागील १५ दिवसांत चार माकडांना शॉक लागून दगावण्याच्या घटना घडल्या आहेत.

तीव्र पाणीटंचाईचा तडाखा मुक्या प्राण्यांना बसत असून पाण्याच्या शोधात आलेल्या माकडाचा विजेच्या तारांचा तीव्र झटका बसल्याने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना खोपोलीत घडली आहे. यात भटक्या मोकाट कुत्र्यांच्या जीवघेण्या हल्ल्याचे पशु पक्षी बळी ठरत आहेत.



बोरघाटात पाण्याचे नैसर्गिक स्रोत्र आटू लागल्याने या जंगलातील वन्यजीव खोपोली शहरातील सार्वजनिक पाणवठ्याचा रस्ता धरत आहेत. त्यामुळे कधी अपघात, तर कधी विजेच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू होत आहे अशीच काही माकडे तहानेने व्याकूळ झाल्याने शहरातील काटरंग मोगल वाडी, वीणानगर भागात पोहचत आहेत.



काटरंग भागात माणसांमुळे भेदरलेली पाच माकडे विजेच्या खांबावर चढली या वेळी विजेचा जोरदार झटका बसल्याने एक माकड गतप्राण झाले, याबाबत माहिती वनविभागाला रहीवाश्यांनी दिली. तोपर्यंत माकड गतप्राण झाले होते. गेल्या १५ दिवसांपासून अशा घटना घडत असल्याने प्राणीमित्रांनी चिंता व्यक्त केली आहे.

**उपाययोजना करण्याची मागणी**

पाण्याच्या शोधात येणारी माकडे अनेकदा घाबरून विजेच्या खांबांवर चढतात. त्यामुळे विजेचा धक्का लागल्यामुळे त्यांचा जीव जातो. अशा घटना घडू नये यासाठी महावितरणने विजेच्या खांबांवर मुक्या जीवांना चढता येऊ नये, अशी उपाययोजना करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बंडू क्षिरसागर व प्राणीमित्रांनी केली आहे. तर जंगलात पाणीसाठवण टाक्या उभाराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# माथेरानमधील ई-रिक्षा वाढविण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमधील सात पैकी तीनच ई रिक्षा सुरू त्यामुळे नागरिक त्रस्त सनियंत्रण समितीने ई-रिक्षांची संख्या वाढवावी, अशी मागणी भाजप महिला अध्यक्षा सुहासिनी शिंदे यांनी केली आहे.

सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर २६ डिसेंबरपासून नगरपालिकेने पुन्हा सात ई-रिक्षांसोबत वाहतूक सुरू केली मात्र महिन्याभरा पासून ई-रिक्षांमध्ये सातत्याने बिगाड होत असल्याने ई-रिक्षाची सेवाच कोलमडून गेली आहे, अवघ्या तीन ई-रिक्षा सुरू असल्याने स्थानिक रहिवासी, विद्यार्थी व पर्यटक यांना तासन तास ई-रिक्षा साठी वाट पहावी लागते. वाहतूक हा देशाच्या राज्य घटनेने प्रत्येकाला दिलेला अधिकार आहे व ही एक अत्यावश्यक सेवा आहे, मात्र ही सेवा नागरिकांना सुरळीत चालू ठेवण्यासाठी सनियंत्रण समिती तितक्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे दिसून येत असल्याने माथेरान शहर भाजपच्या महिला अध्यक्षा सुहासिनी ज्योतिबा शिंदे



यांनी पालकमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ लक्ष देण्याची मागणी केली आहे.

सुप्रीम कोर्टाने हात चालकांनाच ई-रिक्षा द्याव्यात, असा स्पष्ट आदेश १० जानेवारी रोजी दिला त्याच्या अंमलबजावणीची जवाबदारी सनियंत्रण समिती कडे दिली आहे असे असताना देखील ठेकेदारच ई-रिक्षा चालवीत आहे. १० जानेवारी रोजी आदेश प्राप्त होताच तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी ई - रिक्षाची संख्या व मार्ग निश्चित करण्यासाठी पाच सदस्यीय कमिटी गठीत केली होती सदर कमिटीने आठ हजार रहिवाशी, विकेंडला येणारे चार ते पाच पर्यटक व ३५० विद्यार्थी यांची गरज लक्षात

**सनियंत्रण समिती सदस्यांनी माथेरानला भेट द्यावी येथील नागरिकांसोबत संवाद साधावा व नागरिकांच्या समस्या समजून घ्याव्यात.**
**-सुहासिनी ज्योतिबा शिंदे, माथेरान शहर भाजप महिला अध्यक्षा**

घेता चाळीस ई-रिक्षांची सुरवातीला परवानगी देण्याचा प्रस्ताव मांडला होता, परंतु सनियंत्रण समितीच्या काही सदस्यांनी तीव्र आक्षेप घेतल्याने सुरवातीला २० ई-रिक्षा हात रिक्षा चालकांना देण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र या निर्णयाचीदेखील सनियंत्रण समिती अंमलबजावणी करीत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

पालकमंत्री उदय सामंत यांनी वीस ई रिक्षा तत्काळ सुरू करण्याच्या दृष्टीने सनियंत्रण समितीला आदेश द्यावेत, अशी मागणी सुहासिनी शिंदे यांनी केली आहे.

# खालापूरमध्ये भूमापन दिन साजरा

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात बुधवारी (दि. १०) भूमापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. मोजणी साहित्य पूजन करणेत आले व यामध्ये प्लेन टेबल, ETS मशीन, आत्याधुनिक रोवर मशीन इ. साहित्य पूजन करणेत आले. व लोकांना, शेतकरी यांना मोजणी साहित्य प्रदर्शनासाठी ठेवण्यात आली होती.



भूमापन दिनानिमित्ताने भूमि अभिलेख विभाग, खालापूर उप अधीक्षक भूमि अभिलेख शरद एकनाथ काळे यांचे हस्ते मोजणी साहित्य पूजन करणेत आले. या वेळी मुख्यालय सहाय्यक उत्तम केंद्रे, शिरस्तेदार समाधान पाटील, निमतानदार पंकज सनांसे, भाऊसाहेब मुंडे, छाननी लिपिक, शंकर मोरे, भूकरमापक संदीप थोरवे, भूकरमापक, दिपमाला राजपूत, आवक जावक लिपिक, सिद्धेश पावसकर, अभिलेखपाल, ऋषिकेश गरड, शिपाई व इतर कर्मचारी तसेच तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाने खालापूर कार्यालयास ७ रोवर मशीन पुरविले असून आता सर्व मोजणी कामकाज रोवर मशीन द्वारे होणार असून अत्यंत अचूक व गतीमान कामकाज होणार आहे. तसेच लवकरच खालापूर कार्यालयात Emojni version -2 प्रणाली लागू होणार आहे. त्यात जनतेला आपला मोजणी अर्ज आपल्या घरून मोबाईल वरुन सुद्धा मोजणी अर्ज दाखल करता येणार असून 'क' प्रतसुद्धा अर्जदार यांना ईमेलवर मिळणार आहे.

याबाबत मा. उपसंचालक भूमि अभिलेख कोकण प्रदेश, मुंबईचे जयंत निकम यांनी version-2 बाबत सतत आढावा घेवून तात्काळ ते जनतेला वापरासाठी उपलब्ध करून देणेसाठी प्रयत्नशील आहे. यामध्ये अलिबाग भूमि अभिलेख जिल्हा अधीक्षक सचिन इंगळी यांनी मार्गदर्शन केले आहे. उप अधीक्षक शरद ए. काळे यांनीही मार्गदर्शन करीत शंकांचे निरसन केले.

# श्रीवर्धन-मिरज मार्गावर बसचा अपघात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बोरली पंचतन मिरज या मार्गावरती श्रीवर्धन आगारातून सकाळी बस सोडण्यात येते. तर ही बस दुसऱ्या दिवशी परतीच्या प्रवासासाठी मिरज बोरली पंचतन श्रीवर्धन अशी परत येते. ही बस महाड, महाबळेश्वर, वाई, सातारा, कराड मार्गे मिरज असा प्रवास करते, मात्र श्रीवर्धन आगाराकडून या मार्गावरती नेहमी अत्यंत जुन्या व भंगार बसेसच सोडण्यात येतात.

सोमवारी मिरजहून सुटलेली मिरज बोरली पंचतन श्रीवर्धन ही बस बोरली पंचतन जवळ वडवली फाट्या जवळ आली असता बस मध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटून बस दहा फूट खोल खड्ड्यामध्ये उलटली.

या बसमध्ये एकूण ३४ प्रवासी प्रवास करत होते. यामधील वीस प्रवाशांना किरकोळ स्वरूपाची दुखापत झाली आहे. ही बस आंबेनळी घाट, महाबळेश्वर या अत्यंत कठीण व अवघड असलेल्या घाटामधून नियमित प्रवास करत असे.

श्रीवर्धन आगाराकडूनया ठिकाणी नवीन बस द्यावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे - बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदर शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी सदरहू शेतजमीन मिळकतीचे मालक मुहम्मद वासीक मुहम्मद आरीफ पटेल यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे- बारापाडा, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| २६ | ६ | २-८४-०० <br> पो.ख. ०-६२-०० <br> एकुण ३-४६-०० | ४.५१ |

तरी सदर शेतजमीन मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर हक्क - हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर शेतजमीन मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल,
तारीख : १०/०४/२०२४

**सही/-**
**विक्रम म. पाटील**
**ॲडव्होकेट, पनवेल**

पत्ता - मु. पोयंजे, पो. बोकडवीरा, ता. उरण, जि. रायगड.
मो. ९०८२३१७०४८


# कर्जतमध्ये इफ्तार पार्टी उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड आणि कर्जत शहरातील मुस्लिम समाज यांचे अनेक वर्षांचे ऋणानुबंध आहेत. मुस्लिम समाजातील कोणत्याही सणाच्या वेळी आवर्जून उपस्थित राहणारे म्हणून सुरेश लाड यांची ओळख आहे. कर्जत शहरातील सुन्नी मशीद येथे रमजानचे पवित्र महिन्यात इफ्तार पार्टीसाठी सुरेश लाड हे गेली ३० वर्षे अखंडितपणे उपस्थित असतात. त्याबद्दल कर्जत सुन्नी मशीद ट्रस्ट कडून माजी आमदार सुरेश लाड यांचे स्वागत करण्यात आले.

माजी आमदार सुरेश लाड यांनी प्रतिवर्षीप्रमाणे कर्जत येथील सुन्नी मशीद येथे इफ्तार पार्टी साठी हजेरी लावली. त्यांच्यासह तानाजी चव्हाण, रणजित जैन, रामदास घरत, राजेश लाड, राजू ओसवाल, सचिन ओसवाल, अतुल पवार, सुशांत लाड, संदीप लाड, झहीर खान, हमीद खैराट आदी उपस्थित होते. कर्जत सुन्नी मशीद ट्रस्टचे सैदूभाई , रशिदभाई, बिलाल आढाळ लाला चौगुले, इरफान खलिफा, नदीम कुरेशी आणि इतर समाज बांधव उपस्थित होते.



# पत्रकार महेंद्र खैरे यांच्या घरावर दगडफेक

**रेवदंडा :** पत्रकार महेंद्र खैरे यांच्या भरवस्तीत असलेल्या घरावर रात्रीचे सुमारास सहा ते सात अज्ञात युवकांनी कडी व कुलूप घालून दरवाज्यावर लाथा मारल्या व दगडफेक केली. त्याचप्रमाणे घराबाहेर असलेल्या दुचाकीतून पेट्रोल चोरी करून तिची मोडतोड केली.

रात्री घडलेल्या घटनेची तक्रार नोंदविण्यासाठी रेवदंडा पोलीस ठाण्यात महेंद्र खैरे गेले असता पोलिसांनी तक्रार घेण्यास नकार दिला. त्यामुळे पत्रकार खैरे दोन दिवसांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचेकडे तक्रार केली. घार्गे यांनी त्वरीत दखल घेऊन रेवदंडा पोलिसांना तक्रार दाखल करून घेण्याची सूचना दिली. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात दुचाकीचे एकूण अंदाजे १५०० रुपयांचे नुकसान केले म्हणून अज्ञाताविरोधात अदखलपात्र अशी नोंद करण्यात आली आहे.

# पळसदरी येथे स्वामी समर्थ प्रकट दिन

## गुणवंतांचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांचा प्रकट दिन साजरा करण्यात आला. या वेळी हजारो स्वामी भक्तांनी दर्शन घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. स्वामी समर्थ प्रकट दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या गुणवंत व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.



पळसधरी स्वामी समर्थ मठ प्रकटदिन सोहळ्याचे निमिताने विविध क्षेत्रात नाव कमावलेल्या व्यक्तीचा 'आठवण पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. त्यात डॉ. नितीन आरेकर, दिनेश अडावदकर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन ॲड. राजेंद्र निगुडकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलाला डॉक्टर केले त्याबद्दल आदर्श पालक म्हणून श्रीमती रेवती केवरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी विक्रांत दरेकर, राजू पोतदार आदी उपस्थित होते.

सायंकाळी रथयात्रा, महाआरती, सोनल आणि विशाल रसाळ आणि सहकारी यांचा स्वर अभिलाषा हा गायनाचा झाला. या वेळी अभिजित दरेकर, अविनाश निगुडकर, अशोक शितोळे, रंजन दातार, सुधीर पोतदार, प्रभाकर करंजकर, नितीन दगडे, वत्सला वांजळे, समिधा विचारे, सृष्टी नीगुडकर, रघुनाथ निगुडकर, प्रदीप सुर्वे, अंकुश दरेकर, दत्तात्रेय दरेकर, विठ्ठल सुर्वे, मंगेश शिंदे, निलेश सुर्वे, कृष्णकांत दरेकर, महेंद्र शिंदे, रोनित दरेकर, कौस्तुभ पवार, त्रिजित शिंदे, विशाल निगुडकर, सचिन दरेकर, अमित घाडगे, नरेंद्र दरेकर आदी उपस्थित होते.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १. | रोडपाली ८९ | आंबेतखार ३८ | ४३७/१८९ | ०-१३-३ | ५५० चौ.मी. | भुखंड क्र.५३, सेक्टर-१६E, क्षेत्र - ५४९.५२ चौ.मी. | कै.गणपत काना पगडे यांचे वारस<br>१.भालचंद्र गणपत पगडे | निरंक |
| | | रोडपाली २०३ | ३८६/२ | ०-२९-८ | | | | |
| | | रोडपाली ३९ | ३९१/० | ०-२२-३ | | | | |
| | | | एकूण क्षेत्र | ०-६५-४ | | | | |
| २. | दापोली २९ | दापोली १९९ | १८/४<br>१८/६<br>२४/१<br>३५/३<br>८२/६ | ०-२०-८<br>०-१०-०<br>०-९-०<br>०-३१-२<br>०-२०-० | ८०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. E-७, सेक्टर-८, क्षेत्र-७९९.९९ चौ.मी. | १) श्री. गजानन बाबू कुडावकर<br>२) श्रीमती मैनाबाई बाबू कुडावकर<br>३) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर<br>४) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील<br>५) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड<br>६) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील<br>७) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे<br>८) श्रीमती जनाबाई धर्मा पाटील | रे.मु.क्र. १२०/२०१४ या दाव्यामधील निशाणी क्र.१३५ वरील दि.१६.१२.२०२३ रोजी तडजोडपुरशीस नुसार १) श्री. गजानन बाबू कुडावकर, २) श्रीमती मैनाबाई बाबू कुडावकर, ३) श्रीमती चंद्रभागा रघुनाथ जितेकर, ४) श्रीमती भिमाबाई बळीराम पाटील, ५) श्रीमती द्रोपदी विश्वनाथ गायकवाड, ६) श्रीमती गंगाबाई रोहिदास पाटील, ७) श्रीमती नर्मदा रामचंद्र दमडे व ८) श्रीमती जनाबाई धर्मा पाटील यांच्या नावे उलवे नोड येथील इरादित भूखंड क्र. E-७, सेक्टर-८, क्षेत्र-७९९.९९ चौ.मी. या भुखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. |
| | | | एकूण | ०-९१-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निर्दशनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/००७/२०२४-२५

# नवी मुंबईत वाढत्या वाहनांचा बोजा

## बेशिस्त पार्किंगमुळे व्यवस्थेचा खेळखंडोबा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली दिघा ते बेलापूरपर्यंतच्या नवी मुंबई महापालिका क्षेत्रात सातत्याने वाढत्या वाहनांचा बोजा पडत असताना दुसरीकडे बेशिस्त पार्किंगची वाढती बेपर्वाई यामुळे शहरात सातत्याने वाहतूक व्यवस्थेचा खेळखंडोबा होत आहे.

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नेरूळ नवी मुंबई येथे असून नव्या वाहनांची नोंदणी सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे शहराची भौगोलिक स्थिती व पालिका शहरी व ग्रामीण भागातही पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली असून हवी तशी व जागा मिळेल तेथे पार्किंगमुळे वाहतूकव्यवस्थेचा बोजवारा उडत आहे.

शहरात हवे तिथे व हवी तशी वाहन पार्किंग करण्याचे वाढत असून अशा वाहनचालकांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. शहरात मागील वर्षात ३३,३६६ वाहनांची नोंद झाली होती त्यात वाढ होऊन यंदाच्या आर्थिक वर्षात नव्या वाहनांची संख्या ३६ हजारांपेक्षा अधिक झाली आहे. त्यामुळे नवी मुंबई शहरावरील वाहनांचा बोजा सातत्याने वाढत असून शहरातील पार्किंगचा प्रश्न वर्षानुवर्ष अधिक जटील होत चालला आहे. त्यातच शहरातील बेशिस्त पार्किंग करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. मुळातच शहरातील जुन्या नियोजनानुसार करण्यात आलेले पार्किंगची सुविधा अत्यंत तोकडी पडत आहे कारण दुसरीकडे नव्या वाढनांची संख्या वाढतच आहे.

सोसायटीतील एका पार्किंग सुविधेसाठी तीन लाखांच्यापेक्षा अधिक पैसे द्यावे लागत आहे. त्यामुळे हवे तिथे बेशिस्तपणे पार्किंग करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. काही विभागात तर रस्त्याच्या कडेचे पार्किंग हक्काचे पार्किंग असल्याचे सांगत अरेरावीचे प्रकार वाढत आहेत. अंतर्गत वाहतुकीबरोबरच वाशी येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती तसेच जेएनपीटी बंदर, होऊ घातलेला विमानतळ तसेच अटल सेतूमुळे वाहनांची वाढती संख्या वाढतच चालली आहे. त्याचा परिणाम शहरातील रस्ते वाहतूकीवर होऊ लागला आहे. शहरात पार्किंगच्या जागा कमी असताना वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे शहरात सर्वच उपनगरांत दिवसेंदिवस दुतर्फा पार्किंग पाहायला मिळत आहे.

चारचाकी वाहने, मीटर टॅक्सी, रिक्षा, बस, शालेय बस, खासगी सेवा वाहने,रुग्णवाहिका, ट्रक, टँकर, खाजगी चारचाकी, सार्वजनिक तीनचाकी वाहने, ट्रेलर्स, अन्य शासकीय वाहने अशा विविध प्रकारच्या वाहनात वाढ होत असल्याने घराबाहेर पडले तर वाहन पार्किंग करायचे कुठे असा प्रश्न पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे शहरातील पार्किंगची समस्या अधिक बिकट होत आहे. वाढत्या वाहनांमुळे बेशिस्त पार्किंगची समस्या अधिक बिकट होऊ लागली आहे. त्यामुळे बेशिस्त पार्किंगचा मोठा प्रश्न समोर येऊ लागला आहे. तर शहरात वाहतूक पोलिसांना वाहतूक व्यवस्थेसाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

**दुचाकी किंवा चारचाकी यापैकी कोणतेही वाहन घेऊन जायचे असेल तर पार्किंग करण्यासाठी जागा मिळेल का असा प्रश्न सामान्य नागरिकाला पडतो. त्यामुळे रस्त्यावर जिथे गाडी लावायला जागा मिळेल ती आपलीच म्हणत बेकायदा पार्किंग होत आहे. त्यामुळे वाहन घराबाहेर काढण्यापूर्वी विचार करावा लागतो.**

**–सुकृत नाईक,** रहिवासी

**शहरात वाढत्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न निर्माण होत असून नागरिकांनीही याबाबत अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे. हवे तिथे वाहन पार्क करू नये. नवी मुंबईकर नागरिक सजग असून नागरिक शिस्तीचे पालन करत असल्याचे पाहायला मिळत आहे.**

**–तिरुपती काकडे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग

**मागील काही दिवसांपासून वाहननोंदणी वाढली आहे वाहनांची नोंदणी सातत्याने वाढत आहे. शहरात बेशिस्त पार्किंगची समस्या असून संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.**

**–हेमांगिनी पाटील,** उपप्रदेशिक अधिकारी नवी मुंबई

## नवी मुंबई एपीएमसी मार्केटमध्ये ६५ हजार आंब्यांच्या पेट्या दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**



आंबा हे फळ कोणाला आवडत नाही असा माणूस अभावानेच सापडेल. उन्हाळ्याचा हंगाम म्हणजे आंबे प्रेमींसाठी पर्वणीच मानला जातो. यंदा गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर आंबे प्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आली आहे. गेले अनेक दिवस ५० हजार पेट्या मार्केटमध्ये दाखल होत असताना, गेले दोन दिवस मात्र त्यात १५ हजारांची वाढ होऊन नवी मुंबईच्या एपीएमसी येथील फळमार्केटमध्ये तब्बल ६५ हजार आंब्याच्या पेट्या दाखल झाल्या आहेत.

साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या गुढी पाडव्याच्या दिवशी राज्यात अनेक घरांमध्ये आंबे खरेदी करुन, दुपारच्या जेवणार आमरस पुरीचा बेत करण्याची प्रथा असते. अनेकजण नैवेद्यासाठीही आंबे खरेदी करतात. त्यामुळे यंदा खवय्यांना आंब्यांवर आडवा हात मारला जात आहे हे वाढलेली आंब्याच्या पेट्यांची आवक दर्शवत आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा फळ बाजारात आंब्याच्या पेट्यांची संख्या वाढली असल्यामुळे दरांमध्येही घसरण झालेली पहायला मिळते आहे. हापुस आंब्याचं उत्पादन होणाऱ्या रत्नागिरी–देवगड या भागातून दरदिवशी अंदाजे ५० हजार अंबेच्या पेट्या पेट्या नवी मुंबईत येत होत्या, मात्र ८ व ९ एप्रिल या दोन दिवसांत ही संख्या वाढून तब्बल ६५ हजार पेट्या दोन्ही दिवस बाजारात दाखल झालेल्या आहेत. येत्या काळात ६० हजारांच्या घरातंच याव्यतिरीक्त कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू या राज्यातल्या स्थानिक आंब्यांच्या पेट्याही नवी मुंबईत येत आहेत.

हापूस आंब्याला राजमान्यता मिळाली असली तरी केसर या जातीच्या आंब्याची वाट आंबे खवय्ये पाहत आहेत. त्याला कारण देखील तसेच असून केसर हा साखरेसारखा गोड लागतो. खात्रीशीर गोड फळ असल्याने नागरीक हापूस नको पण केसर हवा अशी मागणी करू लागले आहेत.हापूस पेक्षा देखील केसर आंब्याचा गोडवा अधिक असल्याने नागरीक ही मागणी करत असल्याचे फळ विक्रेते देखील मान्य करत आहेत.

**गेले दोन दिवस १५ हजार पेट्यांनी वाढ होऊन ६५ हजार पेट्या मार्केटमध्ये येत आहेत. यासोबतच आंब्याचे दरही ३०० ते ८०० रुपये डझन असून खरेदीला देखील ग्राहकांची चांगलीच पसंती मिळत आहे.**

**–संजय पानसरे,**
**संचालक एपीएमसी फळ बाजार**

### आवक वाढल्यामुळे दरात किरकोळ घसरण

**मालाची आवक वाढल्यामुळे सध्या नवी मुंबईच्या फळ मार्केटमध्ये तयार हापूस आंबा हा ३०० ते ८०० रुपये डझनच्या घाऊक दराने विकला जातोय. तर किरकोळ बाजारात मात्र एक डझन आंब्याला ७०० ते १५०० रूपये असा दर मिळतोय. तसेच हिरवा आंब्याच्या पेटीचा दर सध्या घाऊक बाजरी ४०० ते एक हजारच्या दरात आहे.**

## ब्राह्मण सभेचा वर्धापनदिन उत्साहात



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मण सभा, नवीन पनवेल या संस्थेचा १८वा वर्धापनदिन पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहामध्ये झाला. या निमत्ताने रामभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी वैदिक मंत्रोच्चारात दीपप्रज्वलन आणि परशुराम प्रतिमेचे पूजन सभेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यानंतर शाळकरी मुलींनी आचार्य तुलसीदास यांच्या पदावर आधारित शास्त्रीय नृत्य सादर करून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. नंतर संस्थेतील ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

अयोध्येतील राममंदिर उभारणीच्या पार्श्वभूमीवर रामभक्तीपर गीते हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण होते. सभासद कलाकारांनी रामताण्डव स्तोत्र, विविध संतांचे रामभक्तिपर अभंग, भावभक्तीपर गीते आणि गीतरामायणातील गाण्यांचे सादरीकरण केले. प्रतिभा कुलकर्णी व अथर्व देव यांनी संवादिनीसाथ, समीर सोमण व आदित्य उपाध्ये यांनी तबलासाथ, प्रसाद जोशी व नेहा जोशी यांनी तालवाद्य साथ केली. किरण गोखले यांनी ध्वनिसंयोजन केले. जयश्री ताह्मनकर आणि रीना मिनासे यांच्या बहारदार निवेदनाने कार्यक्रम अभिरुचीपूर्ण ठरला.

संस्थेच्या अध्यक्ष दीपाली जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्रीपाद वैशंपायन यानी आभारप्रदर्शन केले. 'युवोन्मेष' समूहाने कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली.

## 'या' गावांतील पाणीपुरवठा दोन दिवस राहणार बंद

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोतर्फे हेटवणे जलशुद्धीकरण केंद्र व जलवाहिनीवर देखभाल आणि दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार असल्याने हेटवणे जलवाहिनीवरील सर्व गावांसह द्रोणागिरी, जेएनपीटी, उलवे, खारघर, तळोजा नोडना होणारा पाणी पुरवठा शुक्रवार, १२ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ वाजेपासून ते शनिवार, १३ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत बंद राहणार आहे. तसेच त्यानंतरही पुढील २४ तास कमी दाबाने पाणी पुरवठा होणार आहे. प्रभावित परिसरातील नागरिकांनी पाण्याचा साठा करून, या कालावधी दरम्यान पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.



**पनवेल : भाजप महिला मोर्चा उरण तालुका अध्यक्ष राणी सुरज म्हात्रे यांच्या निवासस्थानी श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित करण्यात आली होती. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. त्यांचे म्हात्रे कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी माजी जि. प. सदस्य जीवन गावंड, शशिकांत पाटील आदी उपस्थित होते.**

## युईएस स्कूल, कॉलेजमध्ये गुढीपाडवा

**उरण : वार्ताहर**

मराठी नववर्षाची सुरुवात गुढीपाडवा ह्या शुभदिवसापासून होते, हिच परंपरा जपताना मंगळवारी (दि. ९) युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स अ‍ॅण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजीमध्ये गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सरस्वती मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ गुढी उभारुन पुजा केली. या वेळी त्यांच्यासोबत संस्थेचे मानद सचिव आनंद भिंगार्डे, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला एका शिक्षिकेने गुढीपाडव्याचे महत्त्व सांगितले. त्यानंतर संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांनी सर्व उपस्थितांना पाडव्याच्या आणि नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत तसेच सिनिअर केजीच्याच एका विद्यार्थ्यांने 'राम रक्षा स्तोत्र' म्हणून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सहावी ते ८वीच्या विद्यार्थ्यांनी 'सरस्वती वंदना' म्हटली.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना मिठाई तसेच नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्याक्रम असलेला एनईपी पुस्तकांचा संच देण्यात आली.




## जेएनपीएची लिक्विड कार्गो हाताळण्याच्या क्षमतेत वाढ

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाला (जेएनपीए) लिक्विड बर्थ–३ आणि लिक्विड बर्थ–४ हे अतिरिक्त लिक्विड कार्गो बर्थ सुरू करून लिक्विड कार्गो हाताळणी क्षमतेच्या यशस्वी विस्ताराची घोषणा करताना आनंद होत आहे. सार्वजनिक खाजगी भागीदारी मोडद्वारे जनेपप्रा येथे अतिरिक्त लिक्विड कार्गो बर्थ LB3 आणि LB4 सुसज्ज करणे, चालवणे, देखभाल आणि हस्तांतरण करण्यात आले आहे.

जनेपप्राने रुपये २२५ कोटी अंतर्गत निधीचा वापर करून अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम मोडद्वारे विकसित केले. तसेच सरकारी निर्देशांनुसार सार्वजनिक खासगी भागीदारी मार्गाने ते कार्यान्वित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

नुकत्याच पूर्ण झालेल्या निविदा प्रक्रियेत, मेसर्स जे एसडब्लू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची चालवण्यासाठी अव्वल बोलीदार म्हणून निवड करण्यात आली आहे. ज्याने रुपये २५२ प्रति मेट्रिक टनची कोटेड रॉयल्टी ऑफर केली आहे. ऑपरेटरसाठी अंदाजे भांडवली खर्च रुपये ६९ कोटी इतका आहे. मेसर्स जेएसडब्लू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला १९ फेब्रुवारी २०२४ रोजी लेटर ऑफ इंटेंट प्रदान करण्यात आला आणि ८ एप्रिल २०२४ रोजी सवलत करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

जनेपप्राचे अध्यक्ष उन्मेष वाघ, यांनी या निर्णयाबद्दल आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, लिक्विड कार्गो हँडलिंग क्षमतेचा विस्तार करण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आणि जनेपप्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी हे एक धोरणात्मक पाऊल आहे. नाविन्यपूर्ण भागीदारी आणि गुंतवणुकीद्वारे, आम्ही उत्कृष्ट सेवा देण्यासाठी आणि या प्रदेशात आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सज्ज आहोत.





**कामोठे :** नव्या वर्षाचे स्वागत करण्याकरिता हिंदू नववर्ष स्वागत समिती कामोठे शहरच्या वतीने गुढीपाडव्याच्या दिवशी भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. या शोभायात्रेत महिला तसेच लहान मुले पारंपरिक वेशभूषा करून मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. या शोभायात्रेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, हॅप्पी सिंग, सुशील शर्मा, शिक्षक सेल अध्यक्ष मनोहर शिंगाडे, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, उपाध्यक्ष सागर ठाकरे, जयकुमार डिगोले आदी उपस्थित होते.



**पनवेल :** गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षानिमित्त शहरात काढण्यात आलेल्या शोभायात्रेत नाच गं घुमा या ग्रुपने सहभाग घेतला होता.



**पनवेल :** येथील दोपोली पुष्पक नगर या ठिकाणी एमपी कन्स्ट्रक्शन ग्रुप मुंडकर अ‍ॅण्ड पाटील रिॲलिटीच्या हरि रेसिडेन्सि या प्रकल्पाचे भूमिपूजन गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले.

# अलिबागमध्ये मतदार जनजागृतीचा जागर

## बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद





**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ निमित्ताने जिल्हा निवडणूक प्रशासनाच्या वतीने बुधवारी (दि.१०) आयोजित उत्सव लोकशाहीचा बाईक रॅलीसाठी मतदार, युवक, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसह उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्यासह जिल्हा पोलीस अधिकारी सोमनाथ घार्गे यांनी जिल्हाधिकारी कार्यालय येथून हिरवा झेंडा दाखवून सुरुवात झाली. या वेळी मतदान जागृतीबाबत पथनाट्याचे आयोजन अलिबाग नगर परिषदेच्या माध्यमातून करण्यात आले होते.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून बुधवारी सकाळी ८ वाजता सुरू झालेली रॅली अलिबाग शहरातील विविध भागातून नेण्यात आली. या वेळी नवमतदार, युवक व नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृतीसाठी आवाहन करण्यात आले.

बाईक रॅलीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक घार्गे यांच्यासह उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, प्रांताधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, तहसीलदार विक्रम पाटील, अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी अंगाई साळुंखे, लायन्स क्लबचे सदस्य उपस्थित होते. प्रिझम संस्थेतर्फे मतदार जनजागृतीपर पथनाट्य कलाकारांनी सादर केले.




# श्रीवर्धनमध्ये घंटागाडी येत असूनसुद्धा रस्त्यावर कचरा टाकण्याचे प्रकार

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन नगर परिषदेची घंटागाडी बाजारपेठेतून सकाळी व संध्याकाळी अशी दोन वेळा कचरा उचलण्यासाठी फिरत असते. प्रत्येक दुकानदार आपला कचरा कचराकुंडीमध्ये भरून एका बाजूला ठेवत असतो. घंटागाडीवरील कर्मचारी सदरची कचराकुंडी उचलून कचरा घंटागाडीमध्ये टाकून घेत असतात, मात्र काही व्यापारी आपला कचरा प्लास्टिक पिशव्यांमध्ये भरून रस्त्यावर ठेवत असल्याचे पहायला मिळत आहे.

श्रीवर्धन बाजारपेठेमध्ये काही नागरिक व व्यापारी कचरा गटारामध्ये फेकण्याचा प्रकारदेखील करीत असतात. बाजारपेठेतील दादर पुलाजवळ असणाऱ्या एका इमारतीसमोर रोज रात्री गटारामध्ये कचरा टाकण्यात येतो. नगर परिषदेचे कर्मचारी रोज सकाळी हा कचरा उपसून नेत असतात, परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा ते गटार कचऱ्याने भरले जाते, तसेच शहरातील काही नागरिकसुद्धा आपल्या घरी कचराकुंडी न ठेवता कचरा गटारात फेकत असल्याचे पहायला मिळते.

नगर परिषदेने नागरिकांना तसेच बाजारपेठेतील दुकानदारांना आपापला कचरा कचराकुंडीमध्ये भरून ठेवावा. नगर परिषदेची घंटागाडी येऊन घेऊन जाईल, अशाप्रकारे सूचना देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मुख्याधिकारी तथा प्रशासक विराज लबडे यांनी याप्रकरणी गंभीरपणे दखल घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

# नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता पालखी सोहळ्याची जय्यत तयारी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेकरांचे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांचा पालखी सोहळा प्रत्येक वर्षी उत्साही वातावरणात साजरा होतो. यावर्षी नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज पालखी सोहळ्यास २४ एप्रिल रोजी प्रारंभ होणार आहे.

गुढीपाडव्याचे औचित्य साधून श्री जोगेश्वरी माता मंदिरात सायंकाळी झालेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत पालखी सोहळ्याचे नियोजन करण्यात आले. या बैठकीस श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाईसाहेब टके, विश्वस्त जयराम पवार, अशोक गुरव, देवीचे पुजारी मधुकर पोवळे, उत्सव कमिटी अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, खजिनदार प्रथमेश काळे, सचिव मंगेश कामथे आदींसह उत्सव कमिटीचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

उत्सव कमिटीचे अध्यक्ष नितीन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रारंभी दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. सचिव मंगेश कामथे यांनी मागील वर्षाचा जमाखर्च वाचून दाखविला यास सर्व ग्रामस्थांकडून एकमताने मंजुरी देण्यात आली. ज्या मार्गाप्रमाणे पालखी चालणार, पोलिसांच्या सूचनेनुसार पालखी सोहळ्यात डीजेला पूर्ण बंदी तसेच २४ एप्रिल रोजी सकाळी १० वा. पालखीचे देवळातून प्रस्थान होणार आहे. या पालखी सोहळ्याकरीता विविध ठिकाणाहून ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रमंडळ तसेच माहेरवाशिण महिला भाविक नागोठण्यात उपस्थित राहून पालखीचे दर्शन घेत असतात. या पालखी सोहळ्यानिमित्त संपूर्ण गावाला जत्रेचे स्वरूप प्राप्त होत असते.

# पेणमध्ये उभारली स्त्री अस्मितेची गुढी

**पेण : प्रतिनिधी**

नव्या विचारांचा प्रारंभ करीत पेणमधील महिलांनी समानता व एकता या संकल्पनेची गुढी उभारल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी सांगितले. अंकुर ट्रस्ट व महिला अत्याचारविरोधी मंचामार्फत उभारण्यात आलेल्या एकल महिलांच्या गुढीपाडवा समारंभात त्या बोलत होत्या.

शहरात डॉ. वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाजतगाजत विविध संघटनांच्या वतीने रॅली काढण्यात आली. या वेळी महात्मा गांधी वाचनालयाच्या प्रांगणात एकल महिलांनी मंचाची सार्वजनिक गुढी उभारण्यात आली. पारंपरिक वाद्य महिला व मुलींचे डान्स, लेझीम पथक तसेच मिळूनी आपण गुढी उभारू होऊनी सारे एक सर्वांकडे पोहचवू आपण एकात्मतेचा संदेश असे फलक हाती घेऊन रॅलीत सहभाग घेतला. यामध्ये इनरव्हील क्लब, आई डे केअर, आशा किरण, चाईल्ड हेवन आदी संस्थांनी सहभाग घेतला होता. शहरी मध्यमवर्गीय महिलांसोबत, ग्रामीण कष्टकरी महिला आदिवासी मतिमंद व अनाथ आश्रमातली मुलेही सहभागी झाल्या होत्या. या वेळेस इनरव्हील क्लब कडुन सर्वांना अल्पोपाहार देण्यात आला. या समतेच्या गुढीचे पेणमधील हे बारावे वर्ष आहे.

या वेळी महिलांनी फुगड्या खेळत, लेझीम वर ताल धरला. या वेळेस ज्योती अवघडे, निता कदम, राजश्री पोटफोडे, कविता पाटील आदिनी सहभाग घेतला. या रॅलीचा शेवट महात्मा गांधी वाचनालय पटांगणत एक मतिमंद, आदिवासी, एकल व अनाथ महिलांच्या हस्ते गुढी उभारण्यात झाला.




# आज रमजान ईद सर्वत्र होणार साजरी

**माणगाव** : ईद-ऊल-फित्र म्हणजेच रमजान ईद गुरुवारी (दि.११)सर्वत्र साजरी होणार आहे. इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) धरीत असतात, तसेच नमाज पठण व कुराण वाचनावर तसेच जकात देणे (दानधर्म करणे) यावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो.

या महिन्यात रात्रीची इशाची नमाज झाल्यावर तरविहची विशेष नमाज मुस्लिम बांधव अदा करतात. यावर्षी बुधवारी चंद्रदर्शन झाल्याने गुरुवारी रमजानची ईद साजरी केली जाणार आहे. सामुदायिक नमाज गुरुवारी जामा मशिदीत सकाळी ८ वाजता होणार असल्याचे मस्जिद मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमन हाजीते यांनी सांगितले.

# माणगाव, तळामध्ये चिमुकल्यांनी केले रमजानचे रोजे पूर्ण

**माणगाव : प्रतिनिधी**









इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) धरीत असतात माणगाव नगरपंचायत हद्दीतील आदिल युनूस गजगे यांची कन्या सॉलीहा हिने वयाच्या नवव्या वर्षी अत्यंत कोवळ्या वयात पवित्र रमजानचे सर्व रोजे (उपवास) यशस्वीपणे पूर्ण केल्याने तिचे विशेष कौतुक होत आहे. इम्रान धवलारकर यांची कन्या बुशरा हिने वयाच्या आठव्या वर्षी अत्यंत कोवळ्या वयात पवित्र रमजानचे सर्व रोजे (उपवास) यशस्वीपणे पूर्ण केल्याने तिचे कौतुक होत आहे.

तळा तालुक्यातील मेठ मोहल्ला येथील नसीर शेखमहम्मद रहाटविलकर यांचा सुपुत्र जैद व बरकतअली शेखमहम्मद रहाटविलकर यांचा सुपुत्र अब्दुलकरीम या बंधूंनी वयाच्या नवव्या वर्षी अत्यंत पवित्र रमजानचे सर्व रोजे (उपवास) यशस्वीपणे पूर्ण केल्याने त्याचे तळा तालुक्यातून विशेष कौतुक होत आहे.

इस्लाम धर्मात ईमान, नमाज, रोजा, जकात, हज ही पाच मूलभूत तत्वे मानली जातात. त्यापैकी रमजान महिन्यातील रोजा हा एक आहे. इस्लामी शाबान महिन्यानंतर रमजान महिना सुरू होतो. यावर्षी १२ मार्चपासून रमजान रोजे सुरू झाले होते. हे रोजे अत्यंत कडक असतात. मुस्लिम बांधव रमजान महिन्यात दरवर्षी हे रोजे महिनाभर करतात. यावर्षी मार्च व एप्रिल महिन्याच्या कडक उष्म्याने नागरिक हैराण होत होते.

या परिस्थितीत अत्यंत कोवळ्या वयात रमजानचे सर्व रोजे यशस्वीरित्या पूर्ण करून ते पहिल्या रमजानचे मानकरी ठरल्याने त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# ठाकरे गटाच्या माजी जिल्हा परिषद सदस्य शिवसेनेत दाखल



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील राजिप माजी सदस्या सहारा संदीप कोळंबे यांनी ठाकरे गटातून शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोळंबे यांचा प्रवेश म्हणजे ठाकरे गटाला धक्का ठरला आहे.

तालुक्यातील सावेळे जि. प. गटामधून निवडून गेलेल्या सहारा संदीप कोळंबे शिवसेनेत राजकीय फूट पडल्यानंतर ठाकरे गटात कायम राहिल्या. त्यांची मुदत संपली असून ठाकरे गटाकडून खासदार किंवा आमदार पक्षाचे नसल्याने प्रभागातील विकासकामे होत नव्हती. त्यामुळे एका विचारधारेत सामाजिक कार्य करण्याचे धोरण निश्चित करून संतोष कोळंबे यांच्या पुढाकाराने सहारा कोळंबे यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त पोसरी येथील शिवतीर्थ येथे आयोजित कार्यक्रमात सहारा कोळंबे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी कर्जत तालुकाप्रमुख संभाजी जगताप यांचेसह नसरापूर ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.

# माणगाव-पुणे रस्त्यावर सीएनजी स्टेशन सुरू

**माणगाव** : कोस्ते खुर्द गावात श्री दत्तकृपा सीएनजी स्टेशनचे उद्घाटन मंगळवारी (दि. ९) आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. मान्यवरांनी दत्तूशेट पवार व सुधीर पवार यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी शिवसेना नेते अॅड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, शिवसेना संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, राजिपच्या माजी अध्यक्ष अपेक्षा कारेकर, सामाजिक कार्यकर्ते अनंता महाडिक, हमजा जळगावकर, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख अॅड. महेंद्र मानकर, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, माजी नगरसेवक नितीन बामगुडे, नगरसेवक सचिन बोंबले, भाजपचे शहराध्यक्ष नितीन दसवते आदी उपस्थित होते.



# खोपोलीत मंगलमय वातावरणात हिंदू नववर्षाचे स्वागत





**खोपोली : प्रतिनिधी**

ढोल-ताशांचा गजर, भगवे फडकणारे ध्वज, भगवे फेटे धारण करून सहभागी झालेल्या महिला व पुरुष कार्यकर्ते, जय श्री रामाच्या घोषणा शोभायात्रेत लक्ष वेधून घेत होते. गुढीपाडव्याचे औचित साधून खोपोली शहरात हिंदू संघटनांतर्फे नववर्ष शोभायात्रा काढण्यात आली होती. या नववर्ष स्वागत यात्रेचे नियोजन विश्वहिंदू परिषद, रा. स्व. संघ व हिंदू संघटनातर्फे करण्यात आले होते.

शहरातील हायको कॉर्नरपासून काढण्यात आलेल्या शोभायात्रेचा ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे व युवा उद्योजक विक्रम साबळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रारंभ करण्यात आला. शिवसह्याद्रीचे ढोल पथकाचा गजर त्याचप्रमाणे फटाक्यांची आतषबाजी यामुळे शोभायात्रेला उत्तरोत्तर रंग चढत गेला.

शोभायात्रा सुरू असताना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणेने परिसर दनानात होता, प्रभू श्रीरामाच्या घोषणाही कार्यकर्त्यांकडून देण्यात येत होत्या. शोभायात्रेच्या मागून रथामध्ये प्रभू श्रीरामाची मोठी प्रतिमा त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ही विराजमान झाला होता. खालची खोपोली, मुख्य बाजारपेठ, दीपक चौक, झेनीट कॉर्नर, त्यानंतर शोभा यात्रेचा समारोप दक्षिणमुखी मारुती मंदिरात झाला.

या शोभायात्रेत माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, युवा उद्योजक विक्रम साबळे, माजी नगरसेवक किशोर पानसरे, अमोल जाधव, शिवसेनेचे राहुल जाधव, भाजप शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह अविनाश मोरे, खालापूर तालुका माजी संघचालक राकेश पाठक, बजरंग दलाचे रुपेश मिस्त्री, राष्ट्रीय सेविका समितीच्या माधवी कुवळेकर, जनकल्याण समितीचे जिल्हा कार्यवाह नितीन भावे, करमरकर, गुंडेवार, गौरव तटकरे, भाजप जिल्हा महिला सरचिटणीस अश्विनी अत्रे, विनायक तेलवणे, गुरव, सोनू शेलार, यास विविध मंडळाचे संघटनांचे शेकडो कार्यकर्ते या शोभायात्रेत सामील झाले होते. बाजारपेठेत सामाजिक संघटनांनी पिण्याच्या पाण्याची तसेच सरबताची व्यवस्था केली होती.

आचारसंहिता असल्याने नियमाचे पालन होण्यासाठी पोलीस निरीक्षक शीतलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# धारदार शस्त्र हातात धरून प्रदर्शन करणाऱ्या तरुणावर कारवाई

**महाड : प्रतिनिधी**




महाड शहराजवळील किंजळघर येथे एक तरुण धारदार शस्त्र हातात घेऊन गावात दहशत वाजवण्याच्या उद्देशाने फिरत असताना महाड शहर पोलीसानी तत्काळ धाव घेऊन त्याच्यावर कारवाई केली आहे.

किंजळघर गावात भाड्याने राहणारा परप्रांतीय तरुण नरसिंह हनुमंत पवार (मूळ रा. कुमटक्की, कर्नाटक) हा मंगळवारी (दि.१०)धारदार सुरा हातात घेऊन दहशत माजवण्याच्या उद्देशाने गावात फिरत असताना राजेश पांडुरंग सुतार यांनी महाड शहर पोलिसांना याबाबत माहिती दिली. तो गावातील लोकांना शिवीगाळ आणि मारहाण करण्याची धमकी देत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर कारवाई केली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे हे करीत आहेत.

# हैदराबादचा पंजाबवर निसटता विजय

## शशांक सिंग आणि आशुतोष शर्माचे प्रयत्न निष्फळ

**मोहाली : वृत्तसंस्था**

पंजाबच्या घरच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात हैदराबादने निसटता विजय मिळवला. अखेरच्या चेंडूवर हैदराबादने पंजाबवर अवघ्या दोन धावांनी विजय मिळवला. पंजाबच्या शशांक सिंग आणि आशुतोष शर्मा यांनी पुन्हा एकदा संघासाठी तुफान खेळी केली. या दोघांनी ५० अधिक धावांची शानदार भागीदारी रचली पण संघाला विजय मिळवून देण्यात अवघ्या दोन धावांनी ते चुकले.

२०वे षटक टाकण्यासाठी जयदेव उनाडकट आला होता. तत्पूर्वी या पंजाबच्या शिलेदारांनी १९व्या षटकात १० धावा केल्या होत्या. शेवटच्या ६ चेंडूत पंजाबला २९ धावांची गरज होती. पहिल्या चेंडूवर आशुतोष शर्माने षटकार लगावला. पुढचे दोन्ही चेंडू वाईड होते. आता २१ चेंडूत ५ धावांची गरज होती. पुढच्या चेंडूवर आशुतोष पुन्हा एक षटकार लगावला. तिसऱ्या चेंडूवर दोन धावा घेण्यात यश आले. तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर दोन धावा घेण्यात यश आले. आता २ चेंडूत ११ धावा हव्या होत्या. पाचवा चेंडू उनाडकटने



पुन्हा वाईड टाकला. पुढचा चेंडू पुन्हा आशुतोषने उचलला. चेंडू खूप वर गेला, पण त्रिपाठीने त्याचा झेल सोडला तरीही या दोघांना एकच धावा घेता आली. एका चेंडूत ९ धावा हव्या होत्या आणि शेवटच्या चेंडूवर शशांकने षटकार लगावला, पण २ धावांनी पंजाबने सामना गमावला.

शशांक सिंगने २५ चेंडूत ६ चौकार आणि एका षटकारासह सर्वाधिक ४६ धावा केल्या, तर आशुतोष शर्माने १५ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांसह ३३ धावा केल्या. सॅम करन (२९) आणि सिकंदर रजा (२८) यांनी भागीदारी रचत सामना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला, पण जास्त काळ मैदानात टिकू शकले नाही, तर शिखर धवन १४ धावांवर बाद झाला. प्रभसिमरन सिंग अवघ्या ४ धावा करीत बाद झाला तर बेयरस्टोला खातेही उघडता आले नाही. हैदराबादकडून भुवनेश्वर कुमारने २ विकेट घेतले तर कमिन्स, नटराजन, नितीश रेड्डी आणि उनाडकट यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबादला त्यांच्या डावाची सुरुवात फारशी चांगली करता आली नाही. संघाचे टॉप ऑर्डरमधील फलंदाज एकामागून एक माघारी परतले. यानंतर नितीश रेड्डी आणि अब्दुल समद यांनी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. या दोघांनीही पंजाबसमोर चांगलीच फटकेबाजी केली. रेड्डीने ३७ चेंडूत ६४ तर समदने १२ चेंडूत २५ धावा केल्या. शेवटी शाहबाज अहमदनेही काही चांगले फटके लगावले आणि सतत विकेट गमावूनही हैदराबादने ९ बाद १८२ धावांचा आकडा गाठला.

पंजाबकडून अर्शदीप सिंगने सर्वाधिक ४ विकेट्स घेत २९ धावा दिल्या, तर सॅम करन आणि हर्षल पटेलने प्रत्येकी २ विकेट मिळवल्या. रबाडालाही एक विकेट मिळवण्यात यश आले.

# जोकोविचकडून फेडररचा विक्रम मोडीत

**लंडन : वृत्तसंस्था**



सर्बियाचा तारांकित टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने आपल्या प्रथितयश कारकीर्दीत आणखी एका विक्रमाची नोंद केली. जोकोविच आता जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेला सर्वांत वयस्क पुरुष टेनिसपटू ठरला आहे. त्याने रॉजर फेडररचा विक्रम मोडीत काढला.


३६ वर्षीय असलेला जोकोविच एकूण ४२० आठवडे जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी राहिला आहे. यापूर्वी हा विक्रमही फेडररच्याच नावे होता. फेडररने ३१० आठवडे अग्रस्थान राखले होते. तो अखेरचा जून २०१८मध्ये जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी होता.

जोकोविच आणि फेडरर यांची सर्वकालीन सर्वोत्कृष्ट टेनिसपटूंमध्ये गणना केली जाते. जोकोविचने यापूर्वीही फेडररचे बरेच विक्रम मोडले आहेत. १९६८ सालापासून सुरू झालेल्या खुल्या स्पर्धांच्या युगात सर्वाधिक ग्रँडस्लॅम जेतेपदांचा विक्रम जोकोविचच्या (२४) नावे आहे. फेडररने पीट सॅम्प्रसचा १४ ग्रँडस्लॅम जेतेपदांचा विक्रम मोडीत काढला होता. कारकीर्दीच्या अखेरीस फेडररच्या नावे २० ग्रँडस्लॅम जेतेपदे होती, मात्र त्यानंतर राफेल नदाल (२२) आणि फेडरर (२४) यांनी त्याला मागे टाकले.

जोकोविच सध्या मॉन्टे कार्लो मास्टर्स टेनिस स्पर्धेत खेळत आहे. २६ मेपासून सुरू होणाऱ्या फ्रेंच खुल्या स्पर्धेच्या तयारीसाठी तो या स्पर्धेत सहभागी झाला आहे. फ्रेंच खुल्या स्पर्धेत जोकोविच गतविजेता आहे. सोमवारी जाहीर करण्यात आलेल्या क्रमवारीत, ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेच्या विजेत्या यानिक सिन्नेरने आपले दुसरे स्थान राखले. त्या खालोखाल कार्लोस अल्कराझ, डॅनिल मेदवेदेव आणि अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांचा क्रमांक लागतो.

# अवघ्या नऊ वर्षांच्या अर्शियाने उचलले ७५ किलो वजन

**हरियाणा : वृत्तसंस्था**



सोशल मीडियावर एका व्हिडिओने नेटकऱ्यांचे लक्ष वेधले आहे. हा व्हिडिओ आहे नऊ वर्षांच्या अर्शिया गोस्वामी हिचा. ती युवा वेटलिफ्टर असून तिच्या नावावर काही विक्रमही आहेत. यामध्ये ती तब्बल ७५ किलो डेडलिफ्ट करताना दिसत आहे.

या व्हिडिओला २२ लाखांहून अधिक लाईक्स आले आहेत. ४८ मिलियनहून अधिक व्ह्युज आले आहेत. तिच्या या अकाऊंटवर तिचे याव्यतिरिक्तही अनेक वेटलिफ्टिंगचे व्हिडिओ शेअर करण्यात आले आहेत. अर्शिया ही हरियाणातील पंचकुला येथील असून ती गेल्या काही वर्षांपासून वेटलिफ्टिंग करीत आहे. तिने गेल्या काही वर्षांत वेटलिफ्टिंगमध्ये दाखवलेल्या तिच्या ताकदीने आणि समर्पणाने तिचे कौतुक होत आहे.

तिने २०२१साली जेव्हा वयाच्या सहाव्या वर्षीय ४५ किलो वजन उतलले होते. त्या वेळी ती प्रसिद्धीच्या झोतात आली होती. त्या वेळी ती सर्वांत युवा डेडलिफ्टर ठरली होती. तिने २०२३मध्ये ६० किलो वजन उचलत पुढचे पाऊल टाकले होते. आता तिने अगदी सहजतेने ७५ किलो वजन उचलले आहे. तिने तिच्या एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये असेही सांगितले होते की भारताची ऑलिम्पिक पदकविजेती मिराबाई चानू ही तिची आदर्श असून तिचीही ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याची इच्छा आहे.

# गोरेगाव येथे बुद्धिबळ स्पर्धा



**माणगाव : प्रतिनिधी**

पंचशील बौद्धजन समाज गोरेगाव व देशपांडे चेस अकॅडमी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त माणगाव तालुकास्तरीय भव्य बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन गुरुवारी (दि.११) गोरेगाव बुद्धविहार येथे करण्यात आले आहे. स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथी आणि पाचवी ते दहावी अशा दोन गटात घेण्यात येणार आहे.

स्पर्धेची वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. दोन्ही गटांमध्ये पहिले सात क्रमांक व इतर वैयक्तिक बक्षिसे व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार असून एका स्पर्धकाला जास्तीत जास्त एकच बक्षीस देण्यात येईल. दोन्ही गटांसाठी प्रवेश फी २०० रुपये

स्पर्धेत तालुक्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा तसेच स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी संदीप साळवी (९७६४६२३१३१) किंवा किशोर देशपांडे (८८८८२५०२३४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# सिद्ध वॉरियर्स संघ केपीएलचा विजेता



**रोहा : प्रतिनिधी**

तालुक्यातील खारापटी येथे भव्य टेनिस क्रिकेट स्पर्धा खारापटी प्रीमियर लीग (केपीएल) आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे विजेतेपद सिद्ध वॉरियर्स संघाने पटकाविले. शितल वॉटर संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेत आई सालबादेवी प्रसन्न (संघमालक दिनेश पोकळे), शुभ्रा वॉरियर्स (श्रीधर मळेकर), सिद्ध वॉरियर्स (सुमेश चोरगे), विघ्नहर्ता (वॉरियर्स मिलनाथ नाईक), श्री गणेश रॉकर्स (सचिन चोरगे), ऋषिकेश पाटील (दर्श), अनय ब्रदर्स (गौरव नाईक, जगदीश पाटील), खारापटी वॉरियर्स (निमेश नाईक, संकेत नाईक), प्रयाग स्मृती (चेष्टा ग्रुप), कारभारी लय भारी (सुहास कारभारी, जीवन कारभारी), साईलीला (रोशन पाटील), द्वारकामाई मित्र मंडळ (मोनेश पोकळे), शितल वॉटर (आर्यन जोशी, पार्थ, गणतांडेल) या संघांनी सहभाग घेतला होता. १९५ खेळाडू विविध संघातून खेळले.

मालिकावीर आयुष अशोक, उत्कृष्ट फलंदाज सुराग दाभाडे, उत्कृष्ट गोलंदाज सतेज चोरगे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक विनोद चोरगे, तर पब्लिक हिरो म्हणून सुशांत पोकळे याची निवड करण्यात आली.

# मांडवखार क्रिकेट स्पर्धेत सिद्धेश स्पोर्टस् संघ विजेता



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सिद्धेश स्पोर्ट्स आयोजित शंकर नामदेव मोकल पुरस्कृत चिंचवली-नारंगी पंचायत प्रिमियर लिग २०२४ (पंचक्रोशी)चे आयोजन करण्यात आले होते. क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी सिद्धेश स्पोर्ट्स मांडवखार संघाला रोख रक्कम ३३ हजार ३३३, द्वितीय क्रमांक देवेंद्र स्पोर्ट्स मांडवखार, तृतीय क्रमांक दुर्वा वॉरियर्स रांजणखार यांनी पटकाविला.

स्पर्धेमध्ये आमदार महेंद्र दळवी, उद्योजक अमित नाईक, शिवसेना नेते विशाल जुईकर, आयोजक शंकर नामदेव मोकल तसेच अजित मोकल, कांचन भुरे, उपसरपंच अल्पेश पाटील, योगेश म्हात्रे, मंगेश पाटील, बंडु पाटील, प्रशांत पाटील, जी. एम. पाटील, सचिन मोकल, संदीप मोकल, शुभम मोकल, सिद्धार्थ मोकल तसेच क्रीडारसिक उपस्थित होते.

बेस्ट बॅट्समन म्हणून विपुल ठाकूर यांना कुलर आणि चषक, बेस्ट बॉलर सोनल पाटील यांना कुलर आणि चषक, बेस्ट फिल्डर राहुल पाटील यांना कुलर आणि चषक, मालिकावीर कल्पेश पाटील यांना सायकल आणि भव्य चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

# श्री देव रवळनाथ क्रिकेट स्पर्धेत गांगेश्वर संघास जेतेपद



**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीदेव रवळनाथ क्रिकेट संघ वायंगणी (मालवण), मुंबई, या मंडळाने गावातील जे तरुण मुंबईत नोकरी, व्यवसाय तसेच शिक्षणमुळे वास्तव्यास आहेत त्यांना एकत्र आणण्यासाठी क्रिकेट सामन्यांचे आयोजन श्रमिक जिमखाना मैदान येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत गांगेश्वर क्रिकेट संघ विजयी ठरला.

स्पर्धेत ३००हून अधिक वायंगणी ग्रामस्थ तरुण खेळाडूंनी सहभागी झाले होते. ज्येष्ठ व जाणकार मंडळींनी या अविस्मरणीय सोहळ्यास उपस्थिती दर्शविली. बाबू राणे, हरिश्चंद्र सावंत, सेमेंद्र सावंत व मंगेश सावंत यांनी या स्पर्धा यशस्वी करण्याकरीता अथक परिश्रम घेतले.

अंतिम सामना गांगेश्वर क्रिकेट संघ विरूद्ध पावणाई क्रिकेट संघात झाला. यात गांगेश्वर क्रिकेट संघ विजयी ठरला, तर संघ पावणाई क्रिकेट संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

अंतिम सामन्यातील सामनावीर चेतन सावंत (गांगेश्वर क्रिकेट संघ), सर्वोत्कृष्ट गोलंदाज प्रदीप सावंत (फोडगेश्वर क्रिकेट संघ), सर्वोत्कृष्ट फलंदाज आतिश सावंत (पावणाई क्रिकेट संघ), मालिकावीर ऋषिकेश सावंत (गांगेश्वर क्रिकेट संघ) यांना गौरविण्यात आले.

# रवी शास्त्रींच्या फोटोची सोशल मिडियावर चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचे माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री यांनी सोशल मिडियावर एक भन्नाट फोटो पोस्ट केला आहे. त्यांचा हा फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत असून चर्चेचा विषय ठरला आहे.

चाहत्यांनी त्यांच्या या फोटोवर कमेंट्सचा जणू पाऊसच पाडला आहे. इतकेच नव्हे तर शास्त्री यांच्या या फोटोवरील कॅप्शननेही सर्वांचे लक्ष वेधले आहे. ६१ वर्षीय रवी शास्त्री सध्या आयपीएल २०२४मध्ये समालोचकाच्या भूमिकेत आहेत. रवी शास्त्रींनी क्रिकेटपटूसह प्रशिक्षक, समालोचक अशा विविध भूमिका पार पाडल्या आहेत.

# वीर मराठा संघ मराठा चषकाचा मानकरी



**पनवेल : वार्ताहर**

खेळाला व खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्दात हेतूने सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी यांच्या वतीने मराठा चषक पर्व दुसरे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन महात्मा शाळा मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत वीर मराठा संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत १२ संघांनी सहभाग नोंदवला. अंतिम सामना मागील पर्वाचा विजेता संघ साई इलेव्हन विरुद्ध वीर मराठा यांच्यात अटीतटीचा झाला. यामध्ये वीर मराठा संघाने बाजी मारली.

मालिकावीर खांदेश्वर पोलीस ठाणे संघाचे महेश आयरे, उत्कृष्ट फलंदाज वीर मराठा संघाचा खेळाडू अभिजित, उत्कृष्ट गोलंदाज याच संघाचा सुनील परदेशी, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून साई इलेव्हन संघाचा साहिल पवार याची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभ मराठा समाज मंडळाचे सचिव सदानंद शिर्के, सदस्य व अथर्व ट्रेडिंग कंपनीचे सर्वेसर्वा ओंकार गावडे, सुप्रिया ज्वेलर्सचे मालक रावसाहेब देवकर, मराठा उद्योजक सारथीचे संस्थापक अध्यक्ष अनुराज लेकुरवाळे, खांदेश्वर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अभिषेक भोपी, गणेश ॲम्बुलन्स सर्विसेसचे सचिन जाधव, संस्मरण हॉटेलचे महेंद्र दुदुस्कर यांच्या हस्ते झाला. मराठा समाज मंडळाचे अध्यक्ष संतोष जाधव यांनी सर्वांचे आभार मानले.




# राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत नागपूरच्या समीक्षा, अनंतला सुवर्णपदक

**नागपूर : प्रतिनिधी**

अलिकडेच हरयाणा येथील रोहतकमध्ये खेलो इंडिया स्पर्धेच्या अंतर्गत राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करत कनिष्ठ गटात नागपूरच्या समीक्षा सिंगने सुवर्णपदक पटकावले. उत्तरप्रदेशच्या दिव्यांशीला मात देत समीक्षाने ही कामगिरी केली आहे. स्पर्धेत नागपूरच्या पाच मुष्टीपटूंनी विविध वजनी गटात पदक जिंकले.

अनंत देशमुख याने उत्तरप्रदेशच्या रुप यादवचा पराभव करीत सुवर्ण जिंकले. दुसरीकडे, स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पराभवाचा सामना करावा लागल्यामुळे नागपूरच्या मल्हार साबळे याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. धैर्य कोठी, श्रद्धा खोब्रागडे यांनी देखील उत्तम कामगिरी करत कांस्य पदकाची कमाई केली. पदकप्राप्त सर्व खेळाडू नागपूरच्या मानकापूर मैदानात प्रशिक्षक गणेश पुरोहित यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत. प्रशिक्षणात रौनक खंबाळकर यांनी खेळाडूंना सहकार्य केले.

# सीनिअर राष्ट्रीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पॉवरलिफ्टिंग इंडियाच्या वतीने हैदराबाद येथे क्लासिक सीनिअर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ८ ते १२ एप्रिलदरम्यान होत आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.

महाराष्ट्राच्या संघात मुलांमध्ये ५९ किलो वजनी गटात राहुल कुमार (पुणे), बबन झोरे, (रायगड), ७४ किलो वजनी गटात तन्वीर कोतवाल (सांगली), ९३ किलो वजनी गटात मयूर शिंदे (पुणे), अग्रेल नाडर (ठाणे), १०५ किलो वजनी गटात संकेत चव्हाण (मुंबई उपनगर), गणेश तोटे (रायगड), १२०+ किलो वजनी गटात विजय चंडाल (पुणे); मुलींमध्ये ४७ किलो वजनी गटात तन्वी तापडिया (पुणे), ५७ किलो वजनी गटात डॉ.शर्वरी इनामदार (पुणे), ६९ किलो वजनी गटात साराह मुकादम (मुंबई उपनगर), ७६ किलो वजनी गटात मायानी कांबळे (पुणे), ८४ किलो वजनी गटात कॅरोलीन पेंटसी (पुणे), संहिता मलिक (मुंबई उपनगर), +८४ किलो वजनी गटात प्रिया राव (मुंबई उपनगर) यांचा समावेश आहे. संघाचे प्रशिक्षक म्हणून विजय पाटील (पुणे) व राजहंस मेंहदळे (पुणे), तर व्यवस्थापक म्हणून संजय सरदेसाई काम पाहत आहेत.

सर्व खेळाडूंना महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंगचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार प्राप्त, संजीवन भास्करन आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. राज्य स्पर्धेतील अनेक सीनिअर खेळाडूंची कामगिरी पाहता राष्ट्रीय स्पर्धेतही महाराष्ट्राची मुले व मुली जास्तीत जास्त पदके प्राप्त करतील, असा विश्वास राज्य संघटनेचे सेक्रेटरी संजय सरदेसाई यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com